cmyk

## संपादकीय

### घड्याळाचे काटे पुन्हा मागे फिरविण्यासाठी हल्ला

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम या पर्यटन स्थळावर इस्लामी दहशतवाद्यांनी केलेल्या भीषण हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला आहे. या साऱ्यांना ते केवळ हिंदू आहेत म्हणून ठार मारण्यात आले आहे, हे वास्तव समजून घेतले, तर हा केवळ एक हिंसाचार नसून हिंदू धर्माविरुद्ध युद्ध छेडण्याचा प्रयत्न आहे, असे म्हणावे लागते. अनेक घातक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हा हल्ला करण्यात आला, हे उघड आहे. बराच काळ काश्मीर खोऱ्यात शांतता नांदत आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–०६ | शुक्रवार, दि.२५ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### जवानाची चुकून पाकिस्तानच्या हद्दीत एंट्री, पाक रेंजर्सने घेतले ताब्यात

श्रीनगरः पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत- पाकिस्तान दरम्यान तणाव वाढला आहे. यादरम्यान एक घटना समोर आली. गुरुवारी चुकून पंजाब सीमा ओलांडलेल्या भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) एका जवानाला पाकिस्तान रेंजर्सनी ताब्यात घेतले.

या जवानाच्या लवकर सुटका व्हावी यासाठी दोन्ही देशांमध्ये लष्करी पातळीवर ध्वज बैठक (फ्लॅग मीटिंग) सुरू आहे, असे वृत्त पीटीआयने दिले आहे. २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढला आहे. अशा परिस्थितीत आता चुकून पंजाब सीमा ओलांडून पाकिस्तानच्या हद्दीत प्रवेश केलेल्या एका बीएसएफ जवानाला पाकिस्तान रेंजर्सनी ताब्यात घेतले आहे.

# 'कृष्णा-मराठवाडा उपसा'ची ऑगस्टमध्ये चाचणी

## शेतकऱ्यांना मिळणार सात टिएमसी पाणी



सोलापूर । प्रतिनिधी

कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना एकूण सहा टप्प्यात होणार असून त्याअंतर्गत बीड, धाराशिव, वाशी, भूम, परांडा, कळंब, लोहारा, उमरगा व तुळजापूर या तालुक्यांमधील शेतकऱ्यांसाठी एकूण सात टीएमसी पाणी उजनी धरणातून नेले जाणार आहे. निरा नदीतून उजनीत पाणी आल्यावर ते योजनेअंतर्गत पुढे नेले जाणार आहे. तरीपण, ऑगस्टमध्ये सीना-कोळेगाव धरणातून पाणी या योजनेत सोडून प्रात्यक्षिक घेण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन आहे.

निरा नदीतील पाणी उजनी धरणात आल्यानंतर तेथून ते मराठवाड्यातील नऊ तालुक्यांना दिले जाणार आहे. उजनीतील सात टीएमसी पाणी १५० किमी अंतरावर नेले जाणार आहे. त्यात बीडसाठी १.६८ टीएमसी, धाराशिव, वाशी, भूम, परांडा व कळंब या तालुक्यांसाठी ३.८ टीएमसी आणि लोहारा, उमरगा व तुळजापूर या तालुक्यांसाठी २.२४ टीएमसी पाणी असणार आहे. सध्या घाटणे (ता. मोहोळ) ते रामदरा (ता. तुळजापूर) तलावापर्यंत (५६ ते ६० किलोमीटर) एक टीएमसी पाणी नेण्याचे नियोजन आहे. सध्या निरेतून उजनीत पाणी आणण्यासाठी बोगद्याचे काम सुरू असून त्यासाठी किमान दीड-दोन वर्षे लागतील, असा अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. तोपर्यंत सीना-कोळेगाव धरणातून वाहून जाणारे पावसाचे पाणी रामदरा तलावार्यंत नेण्याचेही नियोजन करण्यात ◀◀ पान २ वर

## छत्तीसगडमध्ये मोठी कारवाई, ५ नक्षली ठार

बिजापूर। वृतसंस्था

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्याच्या कॅरेगुट्टा जंगल भागात मोठी नक्षलविरोधी कारवाई सुरु आहे. या कारवाईत ५ नक्षलवादी ठार झाले आहेत. देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या नक्षलविरोधी कारवाई मानली जात आहे. कारण यात छत्तीसगड, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील २० हजार सुरक्षा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे. त्यांनी बिजापूर जिल्ह्यातील कॅरेगुट्टा जंगल भागात सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरले असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. ही कारवाई सुमारे ४८ तास सुरू आहे. मोस्ट वॉन्टेड कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा यांच्यासह प्रमुख नक्षलवादी नेत्यांच्या हालचालीबद्दल गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली. जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स, ◀◀ पान २ वर

# भारत युद्ध घोषणेच्या तयारीत?

## कॅनडासह विविध देशाच्या दूतावासांना घेतले बोलावून

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आता भारताने आक्रमक भूमिका घेतली असून पाकिस्तानची सर्व बाजूने कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारताने आता एक पाऊल पुढे टाकले असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. परराष्ट्र खात्याने अमेरिका, चीन, रशिया, कॅनडा, इंग्लंडसह विविध देशांच्या राजदूतांशी चर्चा सुरू केली आहे. यावरुन भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध हे युद्धाच्या दिशेने जात असल्याची चर्चा आहे.**

दिल्लीच्या साऊथ ब्लॉकमध्ये परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांची विविध देशांच्या राजदूतांशी चर्चा सुरू आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या भूमिकेची माहिती या राजदूतांना देण्यात येत आहे. दरम्यान, दहशतवाद्यांना त्यांच्या भाषेतच उत्तर दिले जाईल असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या नागरिकांसाठी व्हिसा बंदी केली आहे. तसेचे ४८ तासांमध्ये भारत सोडण्याचे आदेशही दिले आहेत. एकीकडे या गोष्टी घडत असतानाच दुसरीकडे केंद्रीय ◀◀ पान २ वर

### पाकिस्तानचा शेअर बाजार कोसळला

भारताने बुधवारी पाकिस्तानविरोधात महत्त्वाचे निर्णय जाहीर केले. त्याचा थेट परिणाम गुरुवारी कराची स्टॉक एक्सचेंजवर दिसून आला. मार्केट उघडताच केएसई १०० हा इंडेक्स अडीच हजार अंक, अर्थात दोन टक्क्यांनी कोसळला. गुंतवणूकदारांना पाकिस्तानी अर्थव्यवस्थेची चिंता वाटतेय, भारत पुढे काय पाऊल उचलेल याची भीती या गुंतवणूकदारांना देखील आहे हेच यावरून अधोरेखित होते.

### फवाद खानच्या 'अबीर गुलाल' चित्रपटावर बंदी

या हल्ल्यामुळे भारत सरकार ॲक्शन मोडवर आले असून, पाकिस्तानी अभिनेता फवाद खानचा आगामी चित्रपट 'अबीर गुलाल' पहलगाम हल्ल्यामुळे अडचणीत सापडला आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर आता माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सूत्रांनुसार, अबीर गुलाल हा चित्रपट भारतात प्रदर्शितच होऊ दिला जाणार नसल्याची माहिती समोर आली आहे. तसेच यापुढे आता पाकिस्तानी कलाकारांचा कोणताही आशय भारतात प्रसारित किंवा प्रदर्शित होऊ दिला जाणार नसल्याचे सरकारने म्हटले आहे. सध्याच्या राजनैतिक आणि सुरक्षा वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

### "कल्पनाही नसेल अशी शिक्षा त्यांना देऊ – प्रधानमंत्री मोदी



पहलगाम येथे पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवू, त्यांना शोधून काढू आणि त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देऊ, असा वज्रनिर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलून दाखवला. बिहारमधील मधुबनी येथे राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त गुरूवारी झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. पहलगाम येथील बैसरण येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सार्वजनिकरित्या या हल्ल्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली. मोदी म्हणाले, ''देशाच्या शत्रुंनी केवळ केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले आहे. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडीफार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे. आपण त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत पाठलाग करू. आपण त्यांचा शेवटपर्यंत पाठलाग करू. दहशतवादामुळे भारतीयत्वाचे स्पिरीट कधीही कमी होणार नाही.

### "प्रत्येक थेंबावर आमचा अधिकार; पाकिस्तानचा कांगावा

इस्लामाबादः पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार स्थगित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानने भारताच्या या निर्णयाला ''जलयुद्ध'' आणि बेकायदेशीर पाऊल असे घोषित केले आहे. या निर्णयास कायदेशीर आव्हान देण्याचा इशारा देत भारत वर्ल्ड बँकेचा सहभाग असलेल्या करारातून एकतर्फी माघार घेऊ शकत नाही, असे पाकिस्तानने म्हटले आहे. प्रत्येक थेंबावर आमचा हक्क आहे आणि आम्ही तो कायदेशीर, राजकीय पूर्ण ताकदीनिशी आंतरराष्ट्रीय पातळीवर जपण्यासाठी लढू,असे पाकने म्हटले आहे.

## जे कधीच विमानात बसले नाहीत, त्यांनाही शिंदेंनी आणले

### शिवसेना खा.नरेश म्हस्के यांचे वादग्रस्त वक्तव्य

**मुंबई । प्रतिनिधी**

जे लोक कधीच विमानात बसले नाहीत, त्यांना एकनाथ शिंदे यांनी विमानात बसवून आणले, असे वादग्रस्त विधान शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी केले आहे. जम्मू काश्मीर येथे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना आणण्याची मोहीम सध्या सुरू असून यावर म्हस्के यांनी असे विधान केले आहे. त्यामुळे त्यांना टीकेचा सामना करावा लागत आहे.

दहशतवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील पर्यटकांना राज्यात परत आणण्यासाठी विशेष विमानाची सोय करण्यात आली आहे. यावेळी शिवसेना शिंदे गटाची एक टीमही तिथे पोहोचली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही काश्मीरमध्ये गेले आहेत. एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील पर्यटकांना परत आणण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत केली आहे. परंतु, याच्या बढाया नरेश म्हस्के यांनी मारल्या आहेत. पत्रकारांशी बोलताना म्हस्के म्हणाले, ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी आमचे पथक काश्मीरला पाठवले. एकनाथ शिंदे स्वतः त्या ठिकाणी पोहोचलेले आहेत. कोल्हापूर, केरळ, इशाळवाडी या ठिकाणी एकनाथ शिंदे सर्वात आधी पोहोचून मदत करत होते. सरकार तर मदत करत आहे. जे लोक कधीही विमानात बसले नव्हते त्या लोकांना एकनाथ शिंदे ◀◀ पान २ वर

### भारतात होणारी दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धा पुढे ढकलली

**कोलकाता । वृतसंस्था**

पहलगाममध्ये मंगळवारी (दि.२२) झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जूनमध्ये भारतात होणारी दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. एवढेच नाहीतर, या स्पर्धेत पाकिस्तान खेळाडूंच्या प्रवेशावरही बंदी घातली जाऊ शकते. यासंदर्भातील माहितीनुसार दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धा येत्या जूनमध्ये भारतात खेळली जाणार होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भूतानचे खेळाडू रांचीला पोहोचले असून त्यांनी सरावही सुरू केला होता. आता ही स्पर्धा कोणत्या तारखेला आयोजित केली जाईल, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती नाही. याआधी ही स्पर्धा ३ ते ५ मे दरम्यान खेळवली जाणार होती. परंतु, पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा मिळण्यास विलंब झाल्याने ही स्पर्धा पुढे ढकलण्यात आली. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाकिस्तानमधून एकूण ४३ खेळाडूंची नावे पाठवण्यात आली होती, ज्यामध्ये भालाफेकपटू अर्शद नदीम याच्याही नावाचा समावेश आहे.

## बीडमध्ये वेश्याव्यवसायाचे मोठे रॅकेट–अंजली दमानिया

**नाशिक । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्हा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत आहे. या जिल्हात झालेल्या हत्या प्रकरणांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. यातील काही हत्याप्रकरणांची चौकशी चालू आहे. तर काही प्रकरणें न्यायप्रविष्ट आहेत. याच हत्येप्रकरणी गुन्हेगारांना कठोरातील कठोर शिक्षा करावी, अशी मागणी अंजली दमानियांनी सातत्याने केलेली आहे. असे असतानाच आता त्यांनी बीड जिल्ह्यातील वेश्याव्यवसायाचे मोठे प्रकरण समोर आणले आहे. विशेष म्हणजे त्यांनी या प्रकरणाशी संबंधित व्हिडीओ गृहमंत्री तसेच गृहराज्यमंत्र्यांना पाठवल्यानंतर पोलिसांनी रेड टाकली. याबाबतची माहिती अंजली दमानिया ◀◀ पान २ वर



### सदरील कला केंद्रावर पोलिसांचा छापा

केज तालुक्यातील उमरी शिवारात एका लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्रात वेश्या व्यवसाय सुरू असल्याच्या माहितीवरून अनैतीक मानवी व्यापार प्रशतबंध शाखेच्या पोलिसांना छापा टाकला. यावेळी त्याठिकाणी अनैतीक प्रकार सुरू असल्याचे लक्षात आल्याने, तिघांजणांना ताब्यात घेंत गुन्हा दाखल करण्यात आला. दि.२४ एप्रीलच्या रात्री साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्र, उमरी शिवार, ता. केज येथे सदर कला केंद्र संचालक, मालक व मॅनेजर हे काही महिलांकडून वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याची गोपनीय माहिती समजल्यानंतर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी नियंत्रण कक्षाचे सपोनि मधुसुदन घुगे, अनैतीक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाच्या सपोनि श्रीमती गाडे व त्यांच्या पथकाला सदर ठिकाणी छापा टाकण्याचे आदेशित केले. त्यावरुन सदर पथकाने दि.२४ च्या रात्री ३:३० ◀◀ पान २ वर

## जोशी, लेले, मोने कुटुंबियांनी पत्रकार परिषद घेत सांगितला पहलगाममधील रक्तरंजित घटनाक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा बळी गेला. यापैकी ६ जणा महाराष्ट्रातील आहेत. तर चार जण डोंबिवलीतील तीन आणि पनवेलमधील एक जणाचा तर पुण्यातील दोघांचा समावेश आहे. त्यापैकी डोंबिवलीतील हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने कुटुंबियांनी गुरूवारी पत्रकार परिषद घेत पहलगाममधील दहशवाद्यांनी त्यांच्यासोबत घडवून आणलेला ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६२.५० क्विंटल | २,३०१ | २,८२० | २,५७० |
| ज्वारी/हायब्रिड: १६७.०० क्विंटल | १,७०१ | २,८११ | २,२६५ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : १६.०० क्विंटल | ६,००० | ६,६०० | ६,४४१ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ८४.०० क्विंटल | २,०३१ | २,७२२ | २,४२७ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ५,३३० | ६,६०० | ५,५२३ |

## विवेक जॉन्सन यांनी स्विकारला बीड जिल्हाधिकारी पदाचा पदभार

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जान्सन यांनी आज पदभार स्विकारला. श्री. जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते.**




अभियंता पदवी नंतर ते प्रशासकीय सेवेत आहेत. त्यांनी परिविक्षाधिन कालावधीत येथील माजलगाव नगर परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम केलेले आहे. त्यांनी पदभार स्विकारल्यावर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांचे प्रशासनातर्फे स्वागत केले. यावेळी महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती.

# मराठवाडा, विदर्भात पावसाचा अंदाज

## राज्यातील काही भागात उष्णतेच्या लाटेचाही इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात सध्या उन्हाचा कडाका वाढत आहे. मात्र शुक्रवारपासून काही भागात पावसाचाही अंदाज हवामान विभागाने दिला. तर काही ठिकाणी उष्णतेची लाटही कायम आहे.**



मराठवाड्यातील जालना, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा अंदाज देण्यात आला. तर बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात काही भागात उष्णतेची लाट असेल तर काही ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह पावसाचाही अंदाज हवामान विभागाने दिला. विदर्भातील अनेक भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. अकोला जिल्ह्यात तीन दिवस, अमरावती, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा अंदाज हवामान विभागाने दिला. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात शनिवार ते सोमवार काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. विदर्भातील भंडारा, गोंदीया, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात रविवारी आणि सोमवारी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाजही हवामान विभागाने दिला. सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेची लाट तर काही ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. तसेच शनिवारी आणि रविवारी काही ठिकाणी विजा तसेच ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाजही हवामान विभागाने दिला. सांगली जिल्ह्यात शुक्रवार पासून ३ दिवस हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. सातारा जिल्ह्यात शनिवारी तर कोल्हापूर जिल्ह्यात रविवारी आणि ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# घड्याळाचे काटे पुन्हा मागे फिरविण्यासाठी हल्ला

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम या पर्यटन स्थळावर इस्लामी दहशतवाद्यांनी केलेल्या भीषण हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला आहे. या साऱ्यांना ते केवळ हिंदू आहेत म्हणून ठार मारण्यात आले आहे, हे वास्तव समजून घेतले, तर हा केवळ एक हिंसाचार नसून हिंदू धर्माविरुद्ध युद्ध छेडण्याचा प्रयत्न आहे, असे म्हणावे लागते. अनेक घातक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी हा हल्ला करण्यात आला, हे उघड आहे. बराच काळ काश्मीर खोऱ्यात शांतता नांदत आहे. विशेषत:, केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारा घटनेचा अनुच्छेद ३७० निष्प्रभ केल्यानंतर या भागावरची दहशतवादावरची काळी छाया हळूहळू ओसरु लागली आहे. काश्मीरमध्ये पर्यटन व्यवसायाला बहर येऊ लागला आहे. त्यामुळे तेथील स्थानिकांना शांततेचे महत्त्व अधिकच पटून ते दहशतवादाच्या मार्गापासून दूर होण्याची प्रक्रिया वेगाने होऊ लागली होती. काश्मीरमधील फुटीरतावादाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'हुरियत' या संघटनेचे बळ दिवसेंदिवस कमी होऊ लागले होते. या संघटनेच्या सदस्य असणाऱ्या अनेक संघटनांनी गेल्या दोन-तीन महिन्यांमध्ये हिंसा आणि फुटीरतेचा मार्ग सोडून राष्ट्रीय प्रवाहात येण्याचा निर्णय घेत हुरियतशी संबंध तोडले होते. नुकतीच जम्मू-काश्मीरमध्ये जी विधानसभा निवडणूक झाली, त्या निवडणुकीत गेल्या ४० वर्षांमध्ये झाले नव्हते, तितके मोठ्या प्रमाणात मतदान झाले होते. विशेषत: मुस्लीमबहुल असणाऱ्या काश्मीर खोऱ्यात मतदानाची टक्केवारी दृष्ट लागण्यासारखी होती. कित्येक दशकांमध्ये प्रथमच या प्रदेशात एक खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या मार्गाने निवडून आलेले सरकार स्थानापन्न झाले आहे. या साऱ्या घडामोडी हेच दर्शवित होत्या की काश्मीरची गाडी अनेक दशकांनंतर पुन्हा रुळावर येत आहे. हे अर्थातच दहशतवाद्यांना पाहवणार नव्हते.

काश्मीर खोऱ्यातील लोकांनी सतत दहशतवाद्यांच्या प्रभावाखालीच राहिले पाहिजे, अशी दहशतवादी संघटनांची इच्छा आहे. या इच्छेला या भागात घडणाऱ्या सकारात्मक घडामोडी छेद देत होत्या. त्यामुळे घड्याळाचे काटे पुन्हा मागे फिरविण्यासाठी हा हल्ला करण्यात आला आहे, हे उघड आहे. पर्यटकांच्या मनात भीती निर्माण झाली पाहिजे आणि त्यांनी काश्मीरला येणे थांबविले पाहिजे, हा या हल्ल्याचा दुसरा उद्देश आहे. तसे झाल्यास काश्मीर खोऱ्यातील स्थानिक तरुणांचा रोजगार बंद होईल, आणि त्यांच्यासमोर पुन्हा दहशतवादी बनण्याखेरीच दुसरा मार्ग राहणार नाही, अशी स्थिती निर्माण करणे, हे दहशतवाद्यांचे ध्येय आहे आणि त्याची पूर्ती करण्यासाठी हा हल्ला करण्यात आला आहे. या दहशतवादी हल्ल्यात केवळ अंदाधुंद गोळीबार करुन दहशतवादी पळून गेलेले नाहीत, तर त्यांनी अत्यंत थंड डोक्याने पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन, त्यांना कलमा पढण्यास सांगून ज्यांना कलमा पढता आला नाही, अशा हिंदू पुरुष पर्यटकांची गोळ्या घालून हत्या केली, असे प्रत्यक्ष पिडीत पर्यटकांनीच स्पष्ट केले आहे. याचा अर्थच हा धर्मयुद्ध छेडण्याचा प्रयत्न आहे असा होतो. केवळ काश्मीरमध्येच नव्हे, तर संपूर्ण भारतात अशांतता निर्माण करण्यासाठीचे हे कारस्थान आहे. या हल्ल्यासाठी जी वेळ निवडण्यात आली तीही वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असताना, अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स भारतात आलेले असताना, तसेच केंद्र सरकारने केलेल्या नव्या वक्फ कायद्याला विरोध करण्यासाठी भारतातील अनेक मुस्लीम संघटनांनी प्रक्षोभक भाषा चालविलेली असताना आणि याच कायद्यावरुन पश्चिम बंगालमध्ये दंगल उसळलेली असताना, हा हल्ला करण्यात आला. याचाच अर्थ असा की दहशतवादी संघटना भारतातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. ही स्थिती आणखी बिघडविण्यासाठी त्यांचे प्रयत्न होत आहेत. या सर्व प्रयत्नांना खतपाणी घालण्याचे काम पाकिस्तानकडून केले जाते हे उघडे गुपित आहे. भारताने तसेच हिंदू समाजानेही या हल्ल्यापासून काही महत्त्वाचे धडे शिकणे आवश्यक आहे. भारत सरकारने काश्मीरमधील स्थिती आता पूर्णपणे सुधारलेली आहे, अशा समजुतीत राहणे योग्य नाही. विशेषत: ज्या स्थानी पर्यटकांची संख्या अधिक असते, तेथे सैनिकांच्या तुकड्या ठेवणे आणि सीमेवर अधिक कठोर सुरक्षा व्यवस्था ठेवणे कर्तव्याचे आहे. दहशतवाद हा असा शत्रू आहे, की जो अचानकपणे कोठेही डोके वर काढू शकतो. त्यामुळे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. पर्यटकांच्या समूहांसमवेत शस्त्रधारी सुरक्षा सैनिक असण्याची व्यवस्था करता आली, तर असे हल्ले रोखले जाऊ शकतात. विशेषत: दुर्गम भागांमध्ये तर अधिक चोख सुरक्षा व्यवस्था ठेवावयास हवी. मात्र, काहीवेळा सुरक्षा व्यवस्था चोख असली तरीही असे हल्ले होतात. अशावेळी साऱ्या देशाने एकत्रितपणे, एका आवाजात अशा घटनांचा निषेध करावयास हवा. अशा घटनांचे राजकारण करण्याचा मोह प्रत्येक संबंधिताने टाळावयास हवा. कारण, दहशतवाद हे संकट केवळ एका राजकीय पक्षाशी संबंधित नाही. सर्वच राजकीय पक्षांना, त्यांच्या त्यांच्या सत्ताकाळात या संकटाशी दोन हात करावे लागले आहेत. हिंदू समाजासाठीही या हल्ल्यामुळे एक धोक्याची घंटा वाजविली आहे. उघडपणे धर्म विचारुन हा हल्ला करण्यात आला. यावरुन, दहशतवादाला धर्म नसतो, हा साळसूद प्रचार खोटा पडला. हिंदू हे धर्मांध दहशतवादाचे लक्ष्य असतील, हा संदेश या घटनेतून स्पष्टपणे देण्यात आला. तेव्हा यासंबंधीही विचार करण्याची आणि एकजुटीने राहण्याची आवश्यकता आहे. 'बटेंगे तो कटेंगे' हे सूत्र किती महत्त्वाचे आहे, हे यावरुन समजून येते. मात्र, एका बाबीची नोंद आवर्जून आणि कौतुकाने घ्यावयास हवी. या हल्ल्यानंतर पहलगाममधील स्थानिकांनी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी मेणबत्ती मोर्चा काढला. तसेच संपूण काश्मीर खोऱ्यामध्ये हल्ल्याच्या निषेधार्थ उत्स्फूर्त बंद पाळण्यात आला. असे गेल्या ४० वर्षांमध्ये प्रथमच घडले आहे. याचाच अर्थ असा की काश्मीर खोऱ्यातील स्थानिक मुस्लीम जनतेला आता दहशतवादाविषयी सहानुभूती वाटत नाही, हे स्पष्ट होते. हीच भावना अधिकाधिक वर्धिष्णू करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावयास हवे आहेत. या हल्ल्याला आता ज्या प्रकारे प्रत्युत्तर द्यायचे ते सरकार आणि सुरक्षा दले यांच्याकडून दिले जाईलच. पण काश्मीर खोऱ्यात निराळे वातावरण निर्माण होत आहे, ही सकारात्मक बाबही समोर आली आहे.

# सरपंच आणि ग्रामसेवक विकासाची रत्ने-आदित्य जीवने

## पुरस्कार प्राप्त सरपंच व ग्रामसेवकांचा सत्कार





**बीड । प्रतिनिधी**

**पंचायत राज व्यवस्थेमध्ये ग्रामपंचायतींना अनन्य साधारण महत्व प्राप्त आहे. ग्रामीण भागातील विकासाची संपूर्ण धुरा ही ग्रामपंचायतीवर अवलंबून असल्याने सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी विकासाची रत्ने असल्याचे मत मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी व्यक्त केले.**


राष्ट्रीय पंचायत राज दिन व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पारितोषिक सोहळा तसेच उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी सन्मान उपक्रमात ते बोलत होते. जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात व्यासपीठावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक श्रीमती संगीता देवी पाटील, जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री केंद्रे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मोराळे, कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गंडाळ गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, संजय केंद्रे व श्रीमती समृद्धी दिवाने यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच हे सुसंवाद व समन्वयाने उत्कृष्ट काम करतात याची जाणीव सर्वांना व्हावी तसेच इतरांना प्रेरणा मिळावी याकरिता हा सन्मान सोहळा आयोजित केला जातो मात्र विकासाची ही नाळ कायमस्वरूपी टिकली पाहिजे अशी अपेक्षा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्त केली. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व इतर अभियानामध्ये ग्रामपंचायतीने अधिकाधिक चांगले काम व्हावे व लोकांची मानसिकता वर्तनात बदल होऊन झालेले काम कायमस्वरूपी शाश्वत स्वरूपात टिकावे याकरिता सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे असेही मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्त केले. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान स्पर्धेतील उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा सत्कार आज मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला आर्थिक वर्ष १९ -२० धारूर तालुक्यातील सावरगाव प्रथम अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द द्वितीय केस तालुक्यातील पळसखेडा तृतीय क्रमांकाने पारितोषिक मिळवलेल्या ग्रामपंचायतींना सन्मानित करण्यात आले. आर्थिक वर्ष २०२०- २१ व २१ - २२ गेवराई तालुक्यातील भडंगवाडी प्रथम केज तालुक्यातील मस्सा झोप द्वितीय तर अंबाजोगाई तालुक्यातील देवळा तृतीय पारितोषिक मिळवलेल्या ग्रामपंचायतींना सन्मानित करण्यात आले आर्थिक वर्ष २०२२- २३ धारूर तालुक्यातील असरडोह प्रथम आष्टी तालुक्यातील कुंडी द्वितीय वडवणी रुई पिंपळा तृतीय पारितोषिक मिळवलेल्या ग्रामपंचायतींचा सत्कार करण्यात आला आर्थिक वर्ष २०२३ - २४ बीड तालुक्यातील वंजारवाडी प्रथम,धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण द्वितीय व केज तालुक्यातील कुंबेफळ तृतीय पारितोषिक मिळवलेल्या ग्रामपंचायती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य संघटनेचे सखाराम काशीद यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय गायसमुद्रे यांनी केले.

### मस्साजोग करांनी फेटा बांधलाच नाही

या कार्यक्रमाला संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख आणि या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक उपस्थित होते .मात्र झाल्या घटनेमुळे त्यांनी या कार्यक्रमांमध्ये फेटा बांधला नाही.

## वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री महायज्ञ

**बीड । प्रतिनिधी**



**श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथे आज दिनांक २४/४/२०२५ रोजी वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री महायज्ञ संपन्न झाला.**

मंदिराचे अध्यक्ष ॲड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व गायत्री परिवार बीड कडून आयोजित प्रत्येक एकादशी निमित्त व चतुर्थी निमित्त यज्ञ आयोजित केले जातात या नियमाने आज वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री यज्ञ संपन्न झाला. यामध्ये आजचे यज्ञाचे यजमान गायत्री परिवाराचे बीडजिल्हा समन्वयक मोहन म.खरमाटे सहपरिवार होते तर यज्ञाचे पौरोहित्य रत्नपारखी महाराज व सौ मीनाक्षी गायकवाड यांनी केले. यज्ञाच्या पूर्ण आहुतीनंतर पहलगाम येथे झालेल्या हिंसाचारात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप बांधवां साठी श्रद्धांजली अर्पण केली, यावेळी श्री मुकुंद भुतपल्ले, विलास लेंभे, मुंडे, दुधाळ,मेहत्रे, जाधव, महावीर बोरा साईनाथ दुधाळ, बडे, पोकळे परिवार, परदेशी, पोकळे काकू, चंपावतीपत्र चे पत्रकार महादेव साळुंके हजर होते.

# निळकंठेश्वर संस्थानात कीर्तन महोत्सवाचे आयोजन

## राज्यातील नामवंत कीर्तनकारांची होणार कीर्तने; २७ एप्रिलच्या आरोग्य तपासणी शिबीराने संस्थानची सामाजिक उपक्रमाची परंपरा कायम

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील बालाघाट डोंगर रांगेत अप्पर कुंडलिकाच्या माथ्यावर अगदी निसर्गरम्य ठिकाणी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र निळकंठेश्वर संस्थानात या संस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली भव्य दिव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन २५ ते २७ एप्रिल या कालावधीत करण्यात आले आहे. या महोत्सवाचा लाभ बीड जिल्ह्यातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन निळकंठेश्वर संस्थान पंचक्रोशीतील भाविकांनी केले आहे.**

संतांच्या विचारांच्या अलौकिक सामर्थ्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती संपूर्ण विश्वात प्रतिभासंपन्न आहे. याच परंपरेचा वारसा आधुनिक युगात देखील आदर्श ठरावा यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांतनगरचे संस्थापक अध्यक्ष आचार्य श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांनी यावर्षी देखील वर्धापनदिनानिमित्त भव्य दिव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे. २५ ते २७ एप्रिल या कालावधीत होणारया या कीर्तन महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार असून कीर्तनाच्या माध्यमातून भक्ती माधुर्याचा आनंद भाविकांनी घ्यावा.



शिवमहिम्न स्तोत्र, शिवलिलामृत पारायण, हरिपाठ, कीर्तन,भजन, ज्ञानदान आणि अन्नदान अशी कार्यक्रमाची रेलचेल या महोत्सवात असणार आहे. कीर्तन महोत्सवाबरोबरच यावर्षी मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी शिबिराच्या आयोजनाने निळकंठेश्वर संस्थानची सामाजिक कार्याची परंपरा कायम जपल्या जाणार आहे. वरील सर्व कार्यक्रमाचे आयोजन भगवान श्री निळकंठेश्वर समस्त भक्तपरिवाराने केले असुन कीर्तन महोत्सव आणि मोफत आरोग्य, नेत्र तपासणी शिबीराचा लाभ भाविक भक्त आणि गरजूवंतांनी घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांतनगरचे अध्यक्ष ह.भ.प.आचार्य.श्री.विठ्ठल महाराज शास्त्री व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी केले आहे. शुक्रवार दि. २५ रोजी रात्री ८:०० ते १०:०० वेळेमध्ये महाराष्ट्रातील अल्पावधीतच नावाजलेले व्यक्तीमत्व वारकरी वाणीभुषण ह.भ.प.अर्जुन महाराज मोटे (पळशीकर)यांचे कीर्तन, दि. २६ रोजी शिवमहापुराण कथाकार, विनोदाचार्य ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांचे रात्री ८:०० ते १०:०० या वेळेमध्ये कीर्तन तर दि. २७ एप्रिल रोजी सकाळी १०:०० ते १२:०० या वेळेमध्ये बालयोगी, आत्मविद्याविशारद ह.भ.प. हरिहरजी महाराज दिवेगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने महोत्सवाची सांगता होणार असुन सुज्ञ आणि ज्ञानपिपासू भाविक भक्तांसाठी ही अध्यात्मिक ज्ञान परंपरेची मेजवाणीच असणार आहे. डॉ. अमोल जाधवर (गिताई मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बीड) आणि त्यांची संपुर्ण टीम यांच्या माध्यमातून दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ९:००ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर घेण्यात येणार आहे. या शिबीरात मधुमेह, डायबिटीस, थायरॉईड, दमा, टिबी, फुफ्फुसांचे विकार, बिपी, शुगर, मनक्याचे आजार, नेत्र तपासणी, चष्मा नंबर, सांध्याचे आजार, हात पायांना मुंग्या येणे आणि हाडांच्या सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार केले जाणार असुन ग्रामीण भागातील गरजूवंतांसाठी ही महत्वाची गोष्ट ठरणार आहे. याचाही लाभ सर्वांनी अवश्य घ्यावा.

# पान १ वरून...

### छत्तीसगडमध्ये मोठी

राज्य पोलिसांच्या सर्व तुकड्या, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि त्यांच्या कमांडो बटालियन फॉर रिझोल्यूट ॲक्शन यांच्यासह विविध तुकड्यांतील सुरक्षा कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले आहेत.

-------------

### 'कृष्ण-मराठवाडा उपसा'ची

आले आहे. ऑगस्टमध्ये योजनेच्या घाटणे ते रामदरा तलाव या टप्प्याचे ट्रायल (प्रात्यक्षिक) होणार आहे.

**खरेदी-विक्री व्यवहार, बाजार मूल्यानुसार मिळणार मोबदला**

कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजनेसाठी मोहोळ व उत्तर सोलापूर तालुक्यातील सहा गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत. त्यात मोहोळमधील खुनेश्वर, भोयरे, हिंगणी तर उत्तर सोलापुरातील पडसाळी, गावडी दारफळ व कळमण ही गावे आहेत. काही शेतकऱ्यांनी मोबदल्यावरून विरोध केला असून काहींच्या परवानगीशिवाय कॅनॉलसाठी खोदकाम करण्यात आल्याच्या त्यांच्या हरकती आहेत.या अनुषंगाने भूसंपादन अधिकाऱ्यांनी हरकती मागविल्या आहेत. बाधित जमिनीचे ॲवॉर्ड झाल्यावर संबंधित शेतकऱ्यांसोबत अधिकाऱ्यांच्या बैठका होतील. त्यांच्या हरकतीनुसार पंचनामे होऊन मोबदला निश्चित (बाजारमूल्य किंवा खरेदी-विक्री व्यवहारानुसार जी रक्कम जास्त असेल ती) करून संबंधित शेतकऱ्यांना रक्कम वितरीत होईल. त्यानंतर उर्वरित काम केले जाणार आहे.

-------

### भारत युद्ध घोषणेच्या

गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांची भेट घेतली. यावेळी अमित शाहांच्या हातामध्ये दोन लाल फाईल्स होत्या. त्यामुळे भारताची वाटचाल ही युद्ध घोषणेच्या दिशेने सुरू आहे का अशी चर्चा केली जात आहे.

--------------

### जे कधीच विमानात बसले

यांनी विमानात बसवून आणले आहे,असे खा.नरेश म्हस्के म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावरून आता चांगलेच वादंग उठले आहे.

**यांना कधी श्रेय घ्यायचे याचे भान नाही- वडेट्टीवार**

नरेश म्हस्के यांच्या या विधानावर कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे. ते म्हणाले, ही वेळ काय, कोणी कधी कसले श्रेय घ्यायचे याचे भान राहिले नाही का? पर्यटकांना सुखरूप आणणे महत्वाचे की विमान प्रवास? आणि ते केले म्हणून पण श्रेय घ्यायचे? पहलगाममध्ये महाराष्ट्रातील पर्यटकांचा मृत्यू झाला, काही जखमी झाले, काही अडकले आहे. त्यांना धीर देण्यापेक्षा सगळ्यात आधी तिथे कोण पोहोचत आहे याची स्पर्धा चालली आहे. महायुती सरकारमधील मंत्री, खासदार सगळ्यांनी जबाबदारीचे भान सोडले आहे. किमान अशा घटनांमध्ये तरी स्वतःचे मार्केटिंग करणे सोडा, असेही ते म्हणाले.

----------

### बीडमध्ये वेश्याव्यवसायाचे

यांनी दिली आहे. अंजली दमानिया नाशिकमध्ये बोलत होत्या. यावेळी बोलत असताना त्यांनी बीडमधील वेश्याव्यवसायाच्या रॅकेटबद्दल माहिती दिली. ''नाशिकला मी वेगळ्या कारणासाठी आले होते. सगळ्यांना फक्त भेटून मी निघणार होते. पण मला महत्त्वाची माहिती द्यायची आहे. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात उंबरी शिवारात वेश्या व्यवसायाचे रॅकेट सुरू होते. त्याचे व्हिडिओ मला आले. ते मी गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले,'' अशी माहिती दमानिया यांनी दिली. पुढे बोलताना, ''हे व्हिडिओ पाठवून या प्रकरणी रेड करावी. तेथे अशा प्रकारचे कृत्य होताना दिसत असेल तर कारवाई व्हावी, अशी मागणी मी केली. माझ्या मागणीनंतर बुधवारी रात्री त्या भागात रेड टाकण्यात आली. तेथे पोलिसांनी काही विचित्र गोष्टी होताना पाहिल्या. तिथे वेश्याव्यवसाय चालू होता हे कन्फर्म झाले. या प्रकरणातील आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला, असेही दमानिया यांनी सांगितले. या प्रकरणात वेश्या व्यवसाय पाहणाऱ्या व्यवस्थापकाच्या मुलालादेखील अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, याआधी अंजली दमानिया यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाचा पाठपुरावा केला होता. त्यांनी बीडचा दौरा करून देशमुख कुटुंबीयांना न्याय देण्याचीही मागणी केली होती. त्यानंतर आता त्यांनी बीडमधील हे वेश्याव्यवसायाचे रॅकेट बाहेर काढले आहे. त्यामुळे या प्रकरणात पुढे नेमके काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

-------------

### सदरील कला केंद्रावर पोलिसांचा छापा

वाजेच्या सुमारास एक डमी ग्राहक व दोन पंचांसह सदर ठिकाणी सापळा रचून छापा टाकला. यावेळी महालक्ष्मी कला केंद्राचा मॅनेजर हा १० महिलांकडून वेश्या व्यवसाय करवून घेतांना आढळून आला. सदर ठिकाणाहून १० पिडीत महिलांची सुटका करण्यात आली असून, सदर कला केंद्राचा मॅनेजर मयूर बाबुराव आंधारे यास ताब्यात घेण्यात आले आहे. सपोनि मधूसुदन घुगे यांच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज येथे महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्राचे मालक सत्वशीला बाबासाहेब आंधारे, कला केंद्र चालवणारे आदित्य सत्वशीला आंधारे, मॅनेजर मयूर बाबुराव आंधारे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीक कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. मधुसुदन घुगे, नियांत्रण कक्ष, स.पो.नि. गाडे, अनैतीक मानवी व्यापार प्रतिबंध कक्ष, पो.ह. बहीरवाळ, पो.ह. शिंदे. पोना. अशवनि गाडे, पोशि घुले, मपोशि अचिना वांजारे, मपोशि भाग्यश्री खांडेकर, यांनी केली आहे.

-------------

### जोशी, लेले, मोने कुटुंबियांनी पत्रकार परिषद

रक्तरंजित घटनाक्रम. तसेच यावेळी संजय लेले यांचा मुलगा हर्षल लेले याने घटनाक्रम सांगताना त्या हल्ल्याचा थरार सांगत काय काय सहन करावे लागले ते सांगितले. पत्रकार परिषदेत बोलताना हर्षल लेले यांने सांगितले की, दहशतवाद्यांनी जेव्हा गोळीबार सुरु केला तेव्हा माझा हात माझ्या वडिलांच्या (संजय लेले) डोक्यावर होता. बाबा त्यांना सांगत होते की, गोळीबार करू नका, त्यांनी हात वर केले होते, त्यावेळी माझ्या हाताला काही तरी जाणवले. आधी मला वाटले की माझ्या हातावर गोळी लागली. मी पटकले झुकलो, आणि उठून नंतर वडिलांचे डोके पाहिले तर ते रक्ताने पूर्ण माखून गेले होते. मी हे जे पाहिले तेव्हा स्थानिकांनी सांगितले की तुम्ही आधी तुमचा जीव वाचवा, जिथे गोळीबार झाला ती जागा अशी आहे की, तिथे जायला तीन तास लागतात, त्या ठिकाणी घोड्यानेच जाता येते. गाडी, सायकर वगैरे काहीही जात नाही. हल्ला झाल्यानंतर सगळे घोडेवाले आले. बाकीचे चालत उतरत होते, चालत उतरण्यासाठी आम्हाला चार तास लागले. माझ्या आईला अर्धांगवायू आहे. तिला मी आणि माझ्या भावाने खांद्यावर उलचून आणले. काही अंतरावर घोडे होते, मग घोडा करून आम्ही तिला बेसला पाठवले. आम्ही चार तास चालत बेसला पोहोचलो. मला आणि इतरांना रूग्णालयात नेण्यात आल्याचे सांगितले. पुढे बोलताना हर्षल लेले म्हणाला की, पहलगाम क्लब म्हणून जागा आहे. तिथे आम्हाला बसविण्यात आले. आम्ही संध्याकाळी ६ च्या सुमारास पोहोचलो. पुढचे काही तास आम्हाला माहिती मिळत नव्हती. त्यानंतर ७.३० वाजण्याच्या सुमारास मला कळले होते की, तिघांचा मृत्यू झाला, माझ्या काकांनी एका आयपीएस अधिकाऱ्यांशी बोलून त्यांच्या घरी राहू दिले. सकाळी सातच्या सुमारास मला कळविण्यात आले की, तुम्हाला मृतदेहांची ओळख पटवायची आहे. मी ओळख पटवली आणि परत आलो तेव्हा मी परत आलो तेव्हा मी सगळ्यांना सांगितले. आम्ही पोलिस कंट्रोल रूममध्ये गेलो. त्यावेळी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, अमित शाह हे सगळे तिथे आले होते. नंतर आम्ही मुंबईत तिघांचे मृतदेह घेऊन आलो आणि बुधवारी अंत्यसंस्कार पार पाडले.

-----------

### मराठवाडा, विदर्भात

सोमवारी पावसाचा अंदाज देण्यात आला. सिंधुदूर्ग जिल्ह्यातही पावसाचा अंदाज आहे. तर पुणे, सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यात उष्णआणि दमट हवामानाचा अंदाज आहे.

----------

## कायमस्वरूपी सेवेत रुजू करा- सभापती, सचिवांकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील अनेक वर्षांपासुन पहारेकरी या पदावर २०१० पासुन सेवा केली असुन बाजार समितीमध्ये कायमस्वरूपी रूजु करून घ्या अशी मागणी संतोष शाम टाकणखार यांनी सभापती, सचिव यांचेकडे निवेदनाव्दारे केली असुन निवेदनाची दखल न घेतल्यास दि. १ मे कामगार दिनापासुन उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. २४/०२/२०१० पासुन आजघडीला सुमारे पंधरा वर्षे पहारेकरी पदावर बाजार समितीमध्ये नियमीत प्रमाणिक सेवा केली असुन वारंवार पत्र व्यवहार करूनहही सभापती, सचिव यांचेशी चर्चा करून निष्ठावंत कर्मचा-यावर अन्याय केला आहे. त्यामुळे माझा कार्यकाळ पाहता प्राधान्याने कायमस्वरूपी सेवेत समावुन घ्यावो अन्यथ बाजार समिती कार्यालयासमोर दि. १ मे कामगार दिनापासुन उपोषण करण्याचा इशारा संतोष टाकणखार यांनी दि. २४ एप्रिल २०२५ रोजी सभापती, सचिव यांना निवेदनाव्दारे दिला आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५




# डॉ.आंबेडकरांमुळेच शिंदे घराणे टिव्हीवर दिसते - उत्कर्ष शिंदे

## वडवणीतील भिमगीतांच्या कार्यक्रमाला लोटला जनसागर; स्टेजच्या पाठीमागील स्क्रीन ठरली आकर्षण

**वडवणी । प्रतिनिधी**

**शिंदे घराण्यामुळे नाही तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्य आणि विचारांमुळेच शिंदे घराणे टी.व्ही वरती भीमगीते सादर करताना दिसत आहेत. असं मत आनंद शिंदे यांचे चिरंजीव तथा सुप्रसिद्ध गायक, संगीतकार आणि अभिनेते डॉ. उत्कर्ष आनंद शिंदे यांनी वडवणी येथील भीम गीताच्या कार्यक्रमात मत व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातून सर्व जाती धर्मातील अफाट जनसागर लोटला होता. तर कार्यक्रमाच्या स्टेजच्या पाठीमागील डिजिटल स्क्रीनने सर्वाचे लक्ष वेधून घेतले होते.**





विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त वडवणी शहरातील सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने काल दि.२२ एप्रिल रोजी शिंदेशाही घराण्यातील तिसऱ्या पिढीतील सुप्रसिद्ध गायक, संगीतकार, अभिनेता डॉ. उत्कर्ष आनंद शिंदे व त्यांचा संच यांच्या भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन आंबेडकर चौक या ठिकाणी सायंकाळी ७ वाजता केले होते. यात सर्वप्रथम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. तर उत्कर्ष शिंदे हे भीम गीताच्या स्टेजवर आल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम विश्ववंदनीय डॉ. आंबेडकर यांच्या प्रथमेचे पूजन करत नतमस्तक झाले. यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने उत्कर्ष शिंदे यांचा भव्य दिव्य असा सत्कार करण्यात आला. यानंतर डॉ. उत्कर्ष शिंदे यांनी आजोबा स्व. प्रल्हादराव शिंदे यांचे नाव घेऊन वंदना केले व त्यांचेच गीत चांदण्याची छाया, कापराची माया, माझा भिमराव होता... या गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमा दरम्यान गायक डॉ. उत्कर्ष शिंदे यांनी ''आहे कुणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला, कुणी नाय केलं भल ग माय माझ्या भिमान केले, गुलामी का तुट गया जाल यह मेरे भिम का कमाल, झेंडे निळे फेटे निळे निळा बाण भिम जयंतीचा जयघोष चालला, तुझ्या रक्तामधला भिमराव पाहिजे, त्या रमाई सारखं बना तुम्ही, नांदण नांदण होत रमाच नांदण, दोनच राजे इंथे गाजले कोकण भुमि वरती एक त्या रायगड एक चवदार तळ्यावर, भित नाही कुणाच्या बापाला हि भिमाच पोरं, एक चमत्कार व्हावा एक जादूच व्हावी गगनातून एक विमान उतराव आणि त्यातून माझ्या भीमानं उतराव,सटबूटात शोभून दिसतोय भीमराव एक नंबर'' यासह अन्य भीम गीते सादर केले गीते सादर करत असताना समाजप्रबोधन देखील केले. यावेळी बोलताना म्हणाले की, अलीकडच्या काळात शिंदेशाही घराण्यांमुळेच टी.व्ही वरती बाबासाहेबांचे गीत गाताना दिसत आहे.असा सर्वत्र समज आहे. परंतु हा समज साफ चुकीचा असून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्य आणि विचारांमुळेच आमचे शिंदेशाही घराण्यातील प्रत्येक जण टी.व्ही वरती भीमगीते सादर करत आहे. असं मत यावेळी शिंदेशाही घराण्याच्या तिसऱ्या पिढीतील सुप्रसिद्ध गायक, संगीतकार, सेनेअभिनेते व आनंद शिंदे यांचे द्वितीय चिरंजीव डॉ. उत्कर्ष शिंदे यांनी मत व्यक्त केले आहे. तर या कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील आंबेडकरी समाजासह इतर सर्व घटकातील नेते, पदाधिकारी व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित. होते. जयंती उत्सव समितीच्या वतीने सुसज्ज असे नियोजन करण्यात आले होते. तर यावेळी पोलीस प्रशासनाचा देखील बंदोबस्त दिसून आला होता. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष नगरसेवक युवा नेते राहुल घाडगे यांच्या सह कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक-अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांनी परिश्रम घेतले. तर शेवटी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक युवा नेते राहुल गाडगे यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल राठोड यांनी केले.

### कधी नव्हे ते दिसून आले

सदरील कार्यक्रमाच्या स्टेजच्या पाठीमागील बाजूस एक भली मोठी अशी डिजिटल स्क्रीन लावण्यात आली होती. यावर तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे चित्रण दिसून आले आणि हीच स्क्रीन या कार्यक्रमाची प्रमुख आकर्षण देखील ठरली असल्याने हे चित्र कधी नवे तेच दिसून आल्याची भावना उपस्थित नागरिकांमधून व्यक्त केली.

### राहुल घाडगे व त्यांच्या सहकाऱ्यांसाठी टाळ्या

या कार्यक्रमाचे सुसज्ज आणि चोख असे भव्य - दिव्य नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे रूप पाहून सुप्रसिद्ध गायक डॉ. उत्कर्ष आनंद शिंदे यांनी देखील वाढ व्वा...व्वा.. केली असल्याने स्वतः गायक यांनी उपस्थित अनुयायांना टाळ्यांच्या गजरात जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक युवा नेते राहुलभाऊ घाडगे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसाठी एकदा टाळ्यांचा आवाज देत अभिनंदन केले आहे.

# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड परीक्षेत विशाखा साळवेला गोल्डमेडल

माजलगाव । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय मथ ऑलिम्पियाड परीक्षेत श्री. सिद्धेश्वर विद्यालय शाळेतील इयत्ता पहिली वर्गामध्ये शिकत असलेली विशाखा विजय साळवे या विद्यार्थीनीने झोनल लेव्हल टॉपर मध्ये क्रमांक पटकवला आहे.



आंतरराष्ट्रीय मथ ऑलिम्पियाड परीक्षासाठी विशाखा साळवे हिने जिद्दीने अभ्यास केल्यामुळे गोल्ड मेडल प्राप्त करून यश संपादन केले. श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालय येथे पालक मेळावा व ऑलिम्पियाड गोल्ड मेडल विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह ॲड.विश्वासराव जोशी, प्रमुख पाहुणे शालेय समिती अध्यक्ष पवन मानधने,पालक प्रतिनिधी लक्ष्मीकांत भावसार,शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती सुमती भारती गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. विशाखा च्या यशाबद्दल मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती, वर्ग शिक्षक गणेश जोशी यांनी अभिनंदन केले.

# ग्रामसेवकांनी माहिती न दिल्यामुळे ग्रामपंचायत समोर उपोषण

**जालना । प्रतिनिधी**

**घनसावंगी तालुक्यातील मौजे साकळगांव येथील ग्रामपंचायत अंतर्गत १४ व १५ व्या वित्त आयोगातील झालेल्या कामाची माहिती अधिकार अंतर्गत माहिती ना दिल्यामुळे ग्रामपंचायत साकळगांव येथे अमरण उपोषण करण्यात येणार आहे असा इशारा सिद्धेश्वर सिताराम धोत्रे यांनी दिला आहे.**

मोजे साकळगांव येथील ग्रामपंचायत मध्ये २०१५ पासून ते २०२५ पर्यंत १४ व्या व १५ व्या वित्त आयोगाच्या ग्रामपंचायत ला येणारी निधीत फार मोठया प्रमाणात म्हणजे अंदाजे १ कोटी रुपयांच्या पुढे भ्रष्टाचार झाल्याची शक्यता आहे, ग्रामसेवक यांना माहिती अधिकार अर्जान्वये माहिती मागितलेली आहे. तसेच गट विकास अधिकारी यांना देखील माहिती अधिकार अर्जाव्दारे माहिती मागीतली आहे. संबधीत ग्रामसेवक भुतेवाड नऊ ते दहा वर्षापासून या गावाचा ग्रामसेवक आहे यांना माहिती मागीतली तर ते मला माहिती न देता मला उलट धमकावून माझ्यावर दबाव टाकण्यात आला आहे आमच्या कडे माहिती उपलब्ध नाही असे उडवाउडविचे उत्तर देत आहे. व माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे. मौजे साकळगांव ग्रामपंचायत मागविलेली माहिती मला माहिती दयावी नसता मी आपल्या ग्रामपंचायत कार्यालया समोर उमरण उपोषण करण्यात येणार आहे असे लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. तिचे माहितीस्तो पत्र देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी जालना. पोलीस अधिक्षक जालना गट विकास अधिकारी प.स घनसावंगी तहसिलदार घनसावंगी पोलीस निरीक्षक घनसावंगी. ग्रामसेवक सरपंच, ग्रा.पू. साकळगांव, यांच्याकडे निवेदन देण्यात आलेला आहे.

# संत सावता महाराज मंदिर भूमिपूजन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा -हनुमान शेलार

**पाटोदा । प्रतिनिधी**

श्रद्धा, संत परंपरेवरील निष्ठा आणि भक्तीचा पवित्र संगम साकार करणारा ''श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर भूमिपूजन सोहळा'' दिनांक २६ एप्रिल २०२५, शनिवार, सकाळी १० वाजता निरगुडी येथे उत्साहात पार पडणार आहे.या पवित्र भूमिपूजन सोहळ्याचे शुभहस्ते होतील ह.भ.प. वसेकर महाराज (श्री क्षेत्र संत सावता महाराज संस्थान, अरण, ता. माढा, जि. सोलापूर) कार्यक्रमाचे अध्यक्ष: आ. सुरेश (आण्णा) धस,(आष्टी,पाटोदा, शिरुर) विशेष उपस्थिती: आमदार योगेश (आण्णा) टिळेकर,(विधान परिषद सदस्य पुणे) प्रमुख पाहुणे माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे आणि आध्यात्मिक संत मंडळींची मांदियाळी या सोहळ्यात राजकीय, आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, महंत ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापू.ह.भ.प राधाताई महाराज सानप,ह.भ.प. शिवाजी येवले,रामदास महाराज,भगवान महाराज, भक्तीदास महाराज शिंदे, अमृत जोशी महाराज यांसह अनेक संत मंडळी आणि स्थानिक नेते मंडळींचा सहभाग लाभणार आहे. तसेच या सोहळ्यात गावातील यशस्वी युवा अधिकारी व पोलिस सेवेतील नविन भरती झालेल्यांचा सन्मान वरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे उपस्थितीत निरगुडी ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नाने उभा राहणारा हा मंदिर प्रकल्प भक्ती, संस्कृती आणि समाजहित यांचं प्रतीक ठरणार आहे. हा एक ऐतिहासिक दिवस असून, सर्व भाविक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन युवानेते हनुमान भैय्या शेलार आणि समस्त ग्रामस्थ, निरगुडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चौकशी झाल्याशिवाय कोणत्याही अधिकारी-कर्मचाऱ्यावर कारवाई करू नये



**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटना छत्रपती संभाजी नगर विभाग आज दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी जन्म मृत्यू प्रमाणपत्राचे अनुषंगाने होणाऱ्या एकांगी कारवाईच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी जालना तसेच विभागीय आयुक्त संभाजीनगर यांना महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेतर्फे निवेदन देऊन सविस्तर चौकशी झाल्याशिवाय कोणत्याही अधिकारी कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्यात येऊ नये याबाबतचे निवेदन सादर करण्यात आले. सदर वेळी महाराष्ट्र राज्य तहसीलदार होण्यापेक्षा संघटनेचे विभागीय अध्यक्ष विजय चव्हाण, विभागीय सचिव मुगाची काकडे, विभागीय संघटक महेंद्र गिरगे, तसेच निवेदन देता वेळेस इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत

खेळाडूंसाठी नवा उत्साह निर्माण केला आहे, असे शुभेच्छा संदेशात म्हणाले. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.आर.राठोड, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.ए.राठोड व क्रीडा शिक्षक प्रविण उत्तमराव ठोंबरे, जि.एस.राठोड व बी.बी.राठोड यांनी त्याच्या अथक परिश्रमाचा गौरव करताना सांगितले की, त्याने दररोज ५ तासांच्या प्रशिक्षणात अलौकिक निष्ठा दाखविली. त्याच्या यशामागे न करता येणारे काहीच नाही हा दृष्टिकोन आहे. गरिबीतून उद्याचा चँपियन आदित्यचा प्रवास संघर्षांनी भरलेला आहे. अंबाजोगाईच्या एका सामान्य मजुराच्या कुटुंबात जन्मलेल्या आदित्यने लहानपणापासून कुस्तीचे आकर्षण अनुभवले. वडील दिलीप भीमराव जाधव यांच्या परिश्रमाने त्याला राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळाली. माझ्या आई-वडिलांनी माझ्या स्वप्नांना पंख दिले. या पदकाचे श्रेय त्यांनाच आहे, असे आदित्यने भावपूर्ण शब्दांत सांगितले. आदित्यच्या या यश बद्दल संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आदित्यचे अभिनंदन करून त्याला शुभेच्छा दिल्या. याबाबत मान्यवरांनी शुभेच्छापर प्रतिक्रिया देताना सांगितले की, (ग्रिको रोमन) कुस्ती खेळात आदित्यच्या यशाने समाजातील युवकांना नवीन दिशा दाखविली आहे. मागासवर्गाच्या सक्षमीकरणासाठी हा क्षण ऐतिहासिक आहे. आदित्यचे अभिनंदन असे जलील शेख (प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग), छत्रपती संभाजीनगर.) म्हणाले. तर या पदकाने केवळ आदित्यचाच नव्हे, तर आश्रमशाळा आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा गौरव वाढला आहे. आदित्यचे यश आश्रमशाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. असे डी.बी.क्षीरसागर (सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय. बीड.) यांनी सांगितले. कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेने शिक्षण पद्धतीने केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर क्रीडा - कौशल्याचीही जोपासना केली आहे, हे आदित्यच्या यशाने सिद्ध झाले. आदित्यला भावी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा व्यक्त करताना शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, अंबाजोगाई.) म्हणाले. तर एखाद्या खेळाडूची खरी योग्यता ही त्याच्या स्पर्धात्मक भावनेत असते. आदित्यच्या खेळातील तीच भावना पाहून आम्हाला विश्वास वाटतो की,आदित्य पुढील वर्षी सुवर्णपदक घेऊन येईल असा विश्वास अरविंद विद्यागर (जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड.) यांनी व्यक्त केला. यावेळी आदित्य जाधवचे अभिनंदन करून त्याच्या यशामध्ये सरावातील सातत्य व त्याचे क्रीडा मार्गदर्शक प्रविण ठोंबरे सर व जि.एस.राठोड सर यांचे दररोजचे मार्गदर्शन व त्याच्या अथक परिश्रमातून हे यश त्याला लाभलेले आहे, आदित्यचे हे यश केवळ शाळेसाठी प्रेरणादायी नसून, अंबाजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्यातील खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे, भविष्यातील मोठ्या स्पर्धेमध्ये आदित्यला यश लाभो अशा शब्दांत दत्ता देवकते (तालुका क्रीडा समन्वयक, अंबाजोगाई.) यांनी आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

# लाडक्या बहिणीची चोरी एक तासात उघडकीस, २ लाखाचं गंठण जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना बस स्थानक इथून निर्मला राजेंद्र व्यवहारे या लाडक्या बहिणीचं दोन लाख ४० हजार रुपये किमतीचा गंठण चोरी गेलो होतो परंतु पोलिसांनी इमानदारीने कसून तपास केल्यामुळे गंठण सदरील महिला एसटी बसने सिल्लोड येथे जाण्यासाठी बस मध्ये चढत असताना कोणी अज्ञात चोरटयाने महिलेच्या गळयातील गंठण चोरल्याचे तक्रारीवरून पोस्टे सदर बाजार येथे कलम ३०३(२) बीएनएस प्रमाणे गून्हा दाखल करण्यात आला होता. त्यावरून पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी डिबी पथकाचे प्रमूख पोउपनि शैलेश म्हस्के यांना सदर गुन्हा उघडकीस आणण्या बाबत सूचना केल्या होत्या. सदर बाजार पोस्टेचे डिबी पथक आरोपीचा बसस्थानक परिसरात शोध घेत असताना एक महिला संशयीत रित्या आढळून आली महीला/ पोहेकों गायकवाड यांच्या मदतीने संशयीत महिलेस तिचे नाव व गाव विचारले असता तिने नाव कलावती सखाराम शिराळे वय २० वर्ष व्यवसाय मजुरी रा. पाथरी ता.जि. परभणी असे सांगितले तसे कोठे जायचे व कुठुन आलेले आहे या बाबत अधिक विचारपुस केली असता उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने संशयीत महिलेची महिला पोहेकों गायकवाड यांनी पंचासमक्ष अंगझडती घेतली असता एक सोन्याचे गंठण ज्यामध्ये काळे व लाल रंग असलेले मनी व मध्यभागी पेंडल असलेले अंदाजे वजन २० ग्रॅम असलेले जु.वा. किंमत अंदाजे २,४०,०००/ - रुपये किंमतीचे महिला पंचा समक्ष जप्त करण्यात आलेले आहे.


सदरची कामगीरी मा.पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल , मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपाणी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भारती यांचे नेतृत्वात डी.बी. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेको/पटेल, पोकों/१५१९ गणेश तेजनकर, पोको/ ९६३ दुर्गेश गोफणे, पोकों/२३० अजीम शेख पोकों/ १६९८ लोढे, पोकों/१४४६ कटकम यांनी केली.

# नगर परिषदेने उन्हाळ्यात पाणी लवकर सोडावे

## मतदारांनी अशा बाबींची नोंद ठेवावी -ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

सध्या कडाक्याचे ऊन आहे. त्यामुळे पाणी भरपूर लागते. अशा परिस्थितीत बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीपासून बीड शहरात पाणी नाही. त्यामुळे नगर परिषदेने पाण्याचे योग्य नियोजन लावून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी. सुविधा पुरवणे, हे नगर परिषदेचे काम आहे. त्यात कोणताही उपकार नाही. त्यामुळे पाणी वेळेवर सोडावे. मतदारांनी अशा बाबी लक्षात ठेवाव्यात, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.



माजलगाव आणि पाली येथून बीडला पाणी येते. माजलगाव कडून येणाऱ्या पाईप लाईनच्या दुरुस्तीमुळे अनेक दिवस पाणी नव्हते. दुरुस्तीचे नियोजन हे अगोदरच करणे आवश्यक होते. मात्र ऐन कडक उन्हाळ्यात पाईप लाईन दुरुस्तीचे काम काढणे चुकीचे आहे. देखरेख करणे हे सातत्यपूर्ण काम आहे. त्यामुळे कुठला पाईप खराब होत आहे, हे नगर पालिकेला अगोदरच माहीत असणे आवश्यक असते. मात्र नियोजनाचा अभाव असलेल्या बीड नगर परिषदेने जनतेची कुचंबना चालवली आहे. कडक उन्हाळ्यात बावीस दिवसापेक्षा जास्त कालावधीनंतर पाणी मिळत असेल, तर नागरिकांनी पाण्यासाठी कोणते नियोजन करावे, याचे उत्तर देखील नगर पालिकेने दिले पाहिजे. नगर परिषद हद्दीतील जनता नगर पालिकेला सातत्याने टॅक्स देत असते. जर जनता टॅक्स देत नसेल तर तो वसूल करण्याची जबाबदारी देखील पालिकेची आहे. मात्र या सर्वाकडे कानाडोळा करून नगर पालिका चुकीच्या पद्धतीने चालत असेल, तर दोषींवर कारवाई व्हायला हवी. त्यामुळे नगर पालिकेने नागरिकांना आवश्यक तेवढे पाणी पुरवावे. आठ दिवसाला पाणी सोडावे, असे आवाहन देखील देशमुख यांनी केले आहे.

# ढोबळी मिरचीच्या रोपांमध्ये शेतकऱ्याची फसवणूक !

## तब्बल ५० लाख रुपयांचे नुकसान, बोगस रोपवाटिकेविरोधात संताप

सातारा : सातारा जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्यातील खटाव तालुक्यात औंध येथील शेतकरी जयवंत जगदाळे यांची ढोबळी मिरचीच्या रोपांमध्ये मोठी फसवणूक झाली आहे. सुमारे ५० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्याने दिली आहे. सांगली जिल्ह्यातील सिद्धेवाडीखण येथील वाघमोडे हायटेक रोपवाटिकेतून घेतलेल्या इंडस ११ आणि प्रोफेसर या वाणांची एकूण ४८ हजार रोपे निकृष्ट आणि बोगस निघाल्याचा आरोप शेतकरी जयवंत जगदाळे यांनी केला आहे.

जयवंत जगदाळे यांनी डिसेंबर महिन्यात साडेपाच एकर क्षेत्रात ढोबळी मिरचीची लागवड केली होती. अपेक्षेप्रमाणे ३० दिवसात कळी लागणे आवश्यक होते, मात्र रोपांना सहाव्या दिवशीच कळी लागली, जी नैसर्गिक प्रक्रियेविरोधात होती. त्यानंतर सतत रोपांची वाढ खुंटत गेली. शेतकऱ्यांनी वारंवार रोपवाटिका मालकाशी संपर्क साधून प्लॉट पाहणीची विनंती केली. परंतू मालकाकडून टाळाटाळ झाली. ७६ दिवस उलटून गेले तरीही रोपांची वाढ झाली नाही. यामागे रोपवाटिकेने ग्रोथ रेग्युलेटर वापरल्याचा संशय व्यक्त केला जातो आहे. यासंदर्भात पंचायत समितीकडे तक्रार दाखल केल्यानंतर उपविभागीय कृषी अधिकारी रमेश देशमुख आणि इतर तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी शेतावर जाऊन पंचनामा केला आणि नुकसान भरपाईची ग्वाही दिली. मात्र, अद्याप या शेतकऱ्याला कोणतीही नुकसान भरपाई मिळालेली नाही. दरम्यान, रोपांची वाढ होत नसल्याने शेतकरी



### पन्नास लाख रूपयाचे नुकसान

शेतकऱ्याने अत्यंत महागडी बियाणं, खत, औषध, मजुरी यावर सुमारे १० लाख रुपयांचे थेट भांडवल खर्च केले आहे. जर रोपे दर्जेदार असती तर एकरी उत्पन्न २५ ते ३० लाख रुपये मिळाले असते. सध्या तरी एकही रुपयाचे उत्पादन या शेतकऱ्याला मिळालेले नाही. त्यामुळं शेतकरी जयवंत जगदाळे यांचे सुमारे ५० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

जगदाळे यांनी वारंवार रोपवाटीका मालकाला फोन केला होता. मात्र, त्यांनी दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळाले. जगदाळे यांनी रोपवाटिका मालकाशी संपर्क साधून प्लॉट पाहणीची विनंती देखील केली होती. परंतू मालकाकडून टाळाटाळ करण्यात आल्याची माहिती शेतकरी जयवंत जगदाळे यांनी दिली आहे. ७६ दिवस उलटून गेले तरीही रोपांची वाढ झाली नाही. त्यामुळं शेतकऱ्याची चिंता वाढली होती. अखेर या ठोबळी मिरचीची रोपं वाया गेल्याचं पाहायला मिळाले.

# ऑस्ट्रेलियन कोंबड्यांमधून रग्गड कमाई

## जोडधंद्यातून सोलापूरचा शेतकरी कमवतोय वर्षाकाठी २० लाख




सोलापूर : सोलापूरच्या एका शेतकऱ्याला जोडधंद्यातून सध्या वार्षिक २० लाख रुपये मिळतात. महाराष्ट्रातल्या अनेक शेतकऱ्यांप्रमाणेच सोलापूरचे शेतकरी अरुण शिंदे शेतीला जोड व्यवसाय म्हणून पोल्ट्री फार्मिंग करतात. राज्यातली प्रसिद्ध असणारी कडकनाथ सारखीच दिसणारी पण काळया रंगाची ऑस्ट्रेलियन कोंबड्यांची जात या शेतकऱ्याने पोल्ट्री फार्मिंगसाठी निवडली आहे. चिकन आणि अंड्यांसाठी प्रसिद्ध असणारी ही कोंबडी सोलापूरच्या शेतकऱ्याला चांगलाच नफा मिळवून देणारी ठरली आहे. या व्यवसायातून अरुण शिंदे गेल्या पाच वर्षांपासून लाखोंमध्ये कमाई करत आहेत.

राज्यात अनेक जण शेतीला जोडधंदा म्हणून डेअरी, पोल्ट्री असे व्यवसाय करताना दिसतात. अनेक जण सरधोपटपणे बाकीचे करतात तसाच व्यवसाय करायला पाहतात . सोलापूरच्या या शेतकऱ्याने सध्या बाजारात सर्वात अधिक किंमत कोणत्या कोंबडीला आहे? सर्वात चांगलं चिकन कोणत्या कोंबडीचं असतं यासाठी कोल्हापूर येथून फार्मिंगचे प्रशिक्षण घेतले .त्यानंतर ऑस्ट्रेलियन जातीची ब्लॅक ऑस्ट्रोलॉर्प प्रगत जात फायदेशीर असल्याचं त्यांच्या लक्षात आलं .मग हळूहळू मांस आणि अंडी उत्पादनासाठी कोंबड्यांची संख्या त्यांनी वाढवली .आता शिंदे यांच्याकडे ब्लॅक ऑस्ट्रोलॉर्प जातीच्या २०० मादी कोंबड्या आहेत .ज्या दररोज १६० ते १७० अंडी देतात .या कोंबडीचे चिकन २०० रुपये प्रति किलो दराने विकले जाते .या कोंबडीच्या एका अंड्याची किंमत १७ रुपये आहे .या व्यवसायातून शेतकऱ्याचे जोडधंद्यातून वार्षिक उत्पन्न २० लाखांच्या घरात गेलाय .गेल्या पाच वर्षांपासून ते हा जोडधंदा करत आहेत. तरुण उद्योजकने दिलेल्या वृत्तानुसार प्रोशक्ती ॲग्रो फार्म असे अरुण शिंदे या शेतकऱ्याच्या पोल्ट्री फार्म चे नाव आहे .सोलापूरच्या कामती खुर्द गावच्या शेतकऱ्याने कोंबडीची प्रगत जात मांस आणि अंडे उत्पादनासाठी फायदेशीर ठरत असल्याचे सांगितले .सध्या बाजारपेठेत या कोंबड्यांचे चिकन तसेच अंडी सर्वाधिक किमतीत विकले जातात .अंड्याची मागणी खाण्यापेक्षा नवीन पिल्ले तयार करण्यासाठी अधिक आहे .ही कोंबडी अडीच ते तीन महिन्यात १.२५ किलोपर्यंत वाढते त्यामुळे या कोंबडीच्या चिकनला साधारण दोनशे रुपये प्रति किलो भाव मिळतो

# जनावरांतील लठ्ठपणा टाळण्याचे उपाय

बऱ्याच शेतकऱ्यांकडे एक किंवा दोनच जनावरे असतात. अशा जनावरांना जास्त प्रमाणात फक्त गहू, मका, ज्वारी भरडून दिली जाते किंवा पीठ जास्त प्रमाणात दिलं जातं. त्यामुळे जनावरे अतिलठ्ठ होण्याचं प्रमाण वाढतं. आपल्याला वाटत आपली गाय चांगली धष्टपुष्ठ आहे. पण जनावर वरुन दिसायला सशक्त, गोल दिसत असल तरी लठ्ठपणाचा त्याच्या उत्पादन क्षमतेवर, प्रजोत्पादनावर अनिष्ट परिणाम होत असतो.

विशेष करुन भाकडकाळ आणि दूध देण्याच्या शेवटच्या काळातील जास्त ऊर्जायुक्त आहारामुळे जनावरांचं अतिपोषण होऊन लठ्ठपणा येतो. याच काळात आहारातील प्रथिनांच्या कमी प्रमाणामुळे ही समस्या अजून वाढते. लठ्ठपणामुळे जनावरावर काय परिणाम होतो तर, जास्तीचे फॅट जनावर विल्यानंतर यकृताकडे जातं त्यामुळे यकृतामध्ये जास्तीचे फॅट जमा होऊन फॅटी लिव्हर सींड्रोम तयार होतो. त्यामुळे कॅल्शिअमची कमतरता निर्माण होते. याशिवा विल्यानंतरच्या समस्यांमध्ये वाढ होते. यामध्ये कासदाह सारख्या आजाराचा समावेश होतो. ज्या गायी गाभणकाळात किंवा वितेवेळी अतिलठ्ठ, जाड असतात त्यांच्यामध्ये विल्यानंतर कॅल्शिअमच्या कमतरतेची लक्षणे अढळतात. अशा प्रकारे उद्भवणाऱ्या कॅल्शिअमच्या कमतरतेमध्ये जनावर उपचारांना लवकर प्रतिसाद देत नाही. अतिलठ्ठ गायीमध्ये विल्यानंतर जास्त प्रमाणात भूक मंदावल्यामुळे कितनबाधा म्हणजे किटोसिस आजाराची लक्षणे दिसून येतात. कितनबाधेवर उपचार करूनही जनावराकडून सहजासहजी प्रतिसाद मिळत नाही. काही जनावरांमध्ये दूध उत्पादन अचानक कमी होतं. गर्भाशयदाह, कासदाह, लंगडणे यांसारख्या समस्याही जास्त प्रमाणात आढळतात. विल्यानंतर ३ ते ४ आठवड्यांमध्ये जनावराची प्रकृती एकदम खालावते. त्यामुळे जनावरांमध्ये माजावर न येणे, मुका माज यासारख्या समस्या दिसून येतात. तसेच दूध देण्याचा काळही कमी होतो. जनावरातील लठ्ठपणा जर टाळायचा असेल तर दूध देण्याच्या शेवटच्या टप्प्यात आणि भाकडकाळात ऊर्जेचं प्रमाण नियंत्रित करून जनावराला संतुलित पशुखाद्य, आहार द्यावा.सर्व जनावरांना वयानुसार, दूध उत्पादन काळ, गाभण काळ, याकडे लक्ष द्यावे लागते.




# सकल राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा घटल्याने स्थलांतर वाढले

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

ग्रामीण भागातून शहरात होणाऱ्या स्थलांतरावर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी चिंता व्यक्त केली आहे. स्थलांतर रोखण्यासाठी कृषीविकास दर आणि क्रयशक्ती वाढीची गरज आहे, असं गडकरी यांनी प्रतिपादन केलं. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात गडकरी बोलत होते. सकल राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा घटता वाटा याकडे गडकरी यांनी लक्ष वेधलं.

गडकरी म्हणाले, ''देशातील शेती क्षेत्राचा सकल उत्पन्नातील वाटा आता १४ टक्के राहिला आहे. कारण शेती आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यात अपयश आलं आहे. परंतु जीवाश्म इंधनाच्या आयात निम्मी करून त्याजागी बायोफ्यूलचा वापर वाढवला तर शेतीचा सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २२ टक्क्यांपर्यंत वाढू शकतो.'' असा दावा गडकरी यांनी केली आहे. शहरी भागाकडे स्थलांतर वाढलं. कारण शेती तोट्याची झाली आहे, असंही गडकरी म्हणाले. पुढे त्यांनी राष्ट्रीय सकल उत्पन्नाची टक्केवारी सांगितली. भारताच्या सकल राष्ट्रीय उपन्नात उत्पादन क्षेत्राचा २२ टक्के वाटा, सेवा क्षेत्राचा



५२-५४ टक्के आणि शेती क्षेत्राचा केवळ १४ टक्के वाटा आहे, असंही गडकरी म्हणाले. यावेळी त्यांनी गांधीच्या खेड्याकडे चलाच्या भूमिकेचं विवेचन केलं. गडकरी यांनी शेती क्षेत्रात बायोफ्युएल निर्मितीच्या संधींबद्दलही सांगितलं. ते म्हणाले, ''कोणतीही योजना यशस्वी होण्यासाठी तंत्रज्ञान सिद्ध असणं, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असणं, कच्चा माल सहज उपलब्ध असणं आणि तयार उत्पादन विकण्याजोगं असणं गरजेचं आहे, असं गडकरी म्हणाले. पुढे गडकरी यांनी पर्याय उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची गरज व्यक्त केली. आपण लोकांना हे सांगू शकत नाही की, जर तुम्ही १० हजार पेट्रोलवर खर्च करत असाल, तर आता पर्यावरणासाठी १५ हजार रुपये खर्च करा, हे शक्य नाही. जर उपाय द्यायचाच असेल, तर तो स्वस्त, पर्यायी, प्रदूषणमुक्त आणि देशी असला पाहिजे, असंही गडकरी यांनी प्रतिपादन केलं. यावेळी गडकरींनी बांबूपासून बनवलेल्या कपड्याचं उदाहरण दिलं. बांबूपासून कपडे आदिवासींनी तयार केले आहेत, म्हणून लोकांना ते खरेदी करण्यास सांगणं हे पुरेसं नाही. त्यामागे बाजारपेठ तयार करावी लागते, असा चिमटाही गडकरींनी काढला. दरम्यान, अन्नधान्य पिकांचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करण्याची गरज असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. त्यातून शेतकऱ्यांना अधिकचं उत्पन्न मिळेल, अशी मतही गडकरी यांनी व्यक्त केलं. परंतु इथेनॉल निर्मितीबद्दल केंद्र सरकारची भूमिका धरसोडीची आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. अलीकडेच साखरेपासून इथेनॉल निर्मितीवर केंद्र सरकारने निर्बंध घातली होती. त्यामुळे ऊस उत्पादकांना त्याचा फटका बसला.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०७ : ८० वर्षांचे युद्ध नेदरलँड्सने जिब्राल्टरजवळ स्पेनचे आरमार बुडवले.
१७९२ : क्लॉड जोसेफ रूगे दि लिलने फ्रेंच राष्ट्रगीतला मार्सेलची रचना केली.
१८२९ : चार्ल्स फ्रीमॅन्टल पश्चिम ऑस्ट्रेलियाला पोचला.
१८४६ : मेक्सिको व टेक्सासच्या प्रजासत्ताक मध्ये सीमावाद चिघळला. चकमकी सुरू.
१८५९ : प्रसिध्द सुएझ कालव्याच्या बांधकामास सुरुवात.
१८६२ : अमेरिकन यादवी युद्ध उत्तरेने न्यू ऑर्लिअन्स जिंकले.
१८६७ : दक्षिण आफ्रिकेत श्वेत लोकांना मतदान करण्याची अनुमती मिळाली.
१८९८ : अमेरिकेने स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले.
१९०१ : अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यात स्वयंचलित वाहनांना नंबरप्लेट लावणे सक्तीचे केले.
१९१५ : पहिले महायुद्ध ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंडचे सैन्य तुर्कस्तानमध्ये उतरले.
१९२५ : जर्मन सैन्यदलाचे कमांडर जनरल आणि राजकारणी पॉल पॉल लुडविग हंस अँटोन फॉन बेनेकेंडोर्फ अंड वॉन हिंदेनबर्ग यांची राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली होती.
१९२६ : ईराणमध्ये रझा शाह पहलवी सत्तेवर.
१९४५ : दुसरे महायुद्ध मिलानमधून नाझींची हकालपट्टी.
१९५३ : डी. एन. ए. रेणूचे अंतरंग उलगडून दाखवणारा वॉटसन आणि क्रीक यांचा शोधनिबंध नेचर मासिकात प्रकाशित झाला.
१९६६ : एका भूकंपामुळे ताश्कंद शहराचा मोठ्या प्रमाणावर विनाश झाला.
१९७४ : पोर्तुगालमध्ये जनतेचा उठाव. लोकशाही पुन्हा अमलात.
१९८२ : रंगीत दूरदर्शन प्रक्षेपणाला सुरुवात.
१९८३ : अंतराळयान पायोनियर १०सूर्यमालेच्या पलीकडे पोचले.
१९८६ : म्स्वाती तिसरा स्वाझीलँडच्या राजेपदी.
१९८९ : श्रीलंकेच्या संसदेने भारतीय वंशाच्या ३,३०,००० तमिळ जनतेला मताधिकार देण्याचा निर्णय घेतला.
२००० : वादग्रस्त आलमट्टी धरणाची उंची ५१९.६ मीटरपर्यंत वाढविण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली.
२००५ : जपानच्या आमागासाकी शहराजवळ रेल्वे अपघात. १०७ ठार.
२००८ : जागतिक मलेरिया दिन
२००८ : हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध कलाकार, अभिनेते व चित्रपट दिग्दर्शक आमिर खान यांना चित्रपट क्षेत्रांतील आपल्या महत्वपूर्ण योगदानाकरता मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृर्ती प्रतिष्ठान देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.
२०१५ : ७.८ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपामुळे नेपाळ देशात ९१०० जण मारले गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

३२ : मार्कस साल्व्हियस ओथो, रोमन सम्राट.
१२१४ : लुई नववा, फ्रांसचा राजा.
१२२८ : कॉन्राड दुसरा, जर्मनीचा राजा.
१२८४ : एडवर्ड दुसरा, इंग्लंडचा राजा.
१५४५ : यी सुन शिन, कोरियन दर्यासारंग.
१५९९ : ऑलिव्हर क्रॉमवेल, ब्रिटीश राजकारणी, अघोषित राजा.
१७४३ : मेवाड प्रांताचे शासक महाराजा महाराणा प्रताप सिंग द्वितीय यांचे पुत्र राजसिंग दुसरा यांचा जन्मदिन.
१७९४ : ब्रिटीशकालीन भारतातील हैदराबाद प्रांताचे रियासतदार(शासक) मुघल शासक मीर फर्कंदा अली खान उर्फ नासिर-उद-दौला यांचा जन्मदिन.
१८१९ : भारतातील जयपूर राज्याचे शासक महाराजा जय सिंह यांचा जन्मदिन.
१८७४ : गुग्लियेमो मार्कोनी, इटलीचा संशोधक, भौतिकशास्त्रज्ञ, रेडिओ संशोधक.
१९०० : प्रख्यात ब्रिटिश नागरी सेवक, मुत्सद्दी आणि राजकारणी तसेच संयुक्त राष्ट्र संघाचे माजी कार्यवाहक सरचिटणीस ह्युबर्ट माइल्स ग्लॅडविन जेब यांचा जन्मदिन.
१९०४ : भारतीय हिंदी साहित्यकार विद्वान चंद्रबली पाण्डेय यांचा जन्मदिन.
१९१२ : भारतीय तमिळ अभ्यासक व लेखक तसचं, तामिळनाडू येथील शैक्षणिक कर्ते म्यू. वरथराजन यांचा जन्मदिन.
१९१८ : हिंदी व मराठी चित्रपट अभिनेते शाहू मोडक यांचा जन्म. (मृत्यू: ११ मार्च १९९३)
१९१९ : साली काँग्रेस पक्षाचे नेता व उत्तर प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री हेमवती नंदन बहुगुणा यांचा जन्मदिन.
१९४० : हॉलिवूडमधील अभिनेता अल पचिनो यांचा जन्म.
१९६१ : अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक करण राझदान यांचा जन्म.
१९६१ : भारतीय-अमेरिकन पत्रकार आणि लेखक दिनेश डिसोझा यांचा जन्म.
१९६४ : भारतीय राजकारणी आर. पी. एन. सिंग यांचा जन्म.
१९६९ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय व्यावसायिक फुटबॉल खेळाडू कालो हरीन यांचा जन्मदिन.
२००८ : जागतिक मलेरिया दिन

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११८५ : अंतोकु, जपानी सम्राट.
१२९५ : सांचो चौथा, कॅस्टिलचा राजा.
१६०५ : नरेस्वान, सयामचा राजा.
१६४४ : चाँगझेंग, चीनी सम्राट.
१७४० : थोरले बाजीराव पेशवे, मराठा साम्राज्याचे पेशवे.
१८४० : सिमिओन-डेनिस पोइसॉन, फ्रेंच गणितज्ञ.
१९९९ : साहित्यिक पंढरीनाथ रेगे यांचे निधन.
२००० : भारतीय चित्रपट गीतकार, पटकथा आणि कथा लेखक मुखराम शर्मा यांचे निधन.
२००२ : लाटव्हियाच्या योगशिक्षिका इंद्रा देवी यांचे निधन. (जन्म: १२ मे १८९९)
२००३ : ब्रिटिश शिल्पकार लिन चॅडविक यांचे निधन. (जन्म: २४ नोव्हेंबर १९१४)
२००५ : स्वामी रंगनाथानंद, भारतीय तत्त्वज्ञानी; अध्यक्ष, रामकृष्ण मिशन.

# टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकमधील १५० विद्यार्थ्यांची प्लेसमेंटसाठी नामांकित कंपन्यांमध्ये थेट निवड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या उच्च दर्जाचे प्रशिक्षण देवून अभियंता (इंजिनियर) घडविणाऱ्या टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मधील १५० विद्यार्थ्यांची आकर्षक पॅकेजवर कमिन्स इंडिया प्रा.लि (पुणे), मायेडा इंडिया प्रा.लि (अहिल्यानगर), तसेच धूत ट्रान्समिशन, बजाज ऑटो, एन.आर.बी.बियरिंग्स आणि पर्स्किऑन इंडिया प्रा.लि सर्व छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली असल्याची माहिती टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.एल.व्ही.बगले यांनी दिली आहे.**

या विद्यार्थ्यांच्या निवडीबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य बगले म्हणाले की, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य व प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांच्या मार्गदर्शनाखाली टी.बी.गिरवलकर हे ग्रामीण भागातील उत्कृष्ट पॉलिटेक्निक ठरले आहे.



राष्ट्रीय स्तरांवरील अनेक मानांकने या संस्थेने मिळविली असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर त्यांच्या नोकरीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. आपल्या पॉलिटेक्निक संस्थेमध्ये स्वतंत्र ट्रेनिंग एँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने देशातील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर करार (टायअप) करण्यात आलेला आहे. यामुळे अनेक कंपन्या संस्थेमध्ये येऊन विद्यार्थ्यांचे कॅम्पस इंटरव्ह्यूव घेत असतात. यावर्षीच्या कॅम्पस इंटरव्ह्यूव मध्ये. कमिन्स इंडिया प्रा.लि (पुणे), मायेडा इंडिया प्रा.लि (अहिल्यानगर), तसेच धूत ट्रान्समिशन, बजाज ऑटो, एन.आर.बी.बियरिंग्स आणि पर्स्किऑन इंडिया प्रा.लि सर्व छत्रपती संभाजीनगर या सारख्या विविध कंपन्यांनी संस्थेमधील मेकॅनिकल इंजिनियरींग, इलेक्ट्रिकल इंजिनियरींग, कॉम्प्युटर इंजिनियरींग अशा विविध शाखांमधील डिप्लोमा व बी.टेक.धारक १५० विद्यार्थ्यांची आकर्षक पॅकेज व मासिक पगारावर थेट नोकरीसाठी निवड केली आहे. अनेक विद्यार्थ्यांची तर एकाचवेळी दोन-दोन कंपन्यांत निवड झाली आहे. जेवढ्या विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या ते सर्वच १५० विद्यार्थी इंटर्नशिप व प्लेसमेंटसाठी निवडले गेले आहेत. एकूण काय तर विद्यार्थ्यांचे शंभर टक्के प्लेसमेंट झाले आहे. या कॅम्पस इंटरव्ह्यूव आयोजनासाठी टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे ट्रेनिंग एँड प्लेसमेंट विभागप्रमुख व्ही.व्ही.कन्नुर, श्रीमती एस.ए.कुलकर्णी, आर.एस.डबीर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या विविध कंपनीमध्ये थेट निवडीबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य व मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, अंबाजोगाई अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रावबावळे आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.एल.व्ही.बगले यांनी सांगितले की, इंटर्नशिप व प्लेसमेंटसाठी गिरवलकर पॉलिटेक्निकच्या या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक कौशल्य, व्यक्तिमत्व यांचा सारासार विचार करून निवड केली आहे. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता दिले जाणारे वैयक्तिक लक्ष, शिस्त, पालकांशी संवाद आणि प्लेसमेंटसाठी विद्यार्थ्यांची करून घेतली जाणारी विशेष तयारी यामुळे या कॉलेज मधील विद्यार्थी नेहमीच कॅम्पस इंटरव्ह्यूव मधून विविध राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवडले जात असतात. प्लेसमेंटसाठी जिल्ह्यात नेहमीच अग्रेसर असलेले गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेज नेहमीच उत्कृष्ट निकाल, प्लेसमेंट, शिस्त आणि संस्कार यासाठी विद्यार्थी व पालक यांच्या कौतुकास पात्र ठरत आहे. गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये असणारे अनुभवी शिक्षक, सर्व साहित्यांनी सुसज्ज प्रयोगशाळा, वर्कशॉप, लैंग्वेज लॅब, सुसज्ज ग्रंथालय, प्रशस्त इमारत, भव्य क्रिडांगण, विविध प्रकारच्या उपक्रम व स्पर्धांचे आयोजन, सर्व सोयी सुविधांनी युक्त वसतीगृह, पर्यावरणपूरक परिसर व संपूर्ण वर्षभर एक्स्ट्रा करिक्युलर ऍक्टिव्हिटीजवर दिला जाणारा भर यामुळे गिरवलकर पॉलिटेक्निक या कॉलेज मधून बाहेर पडणारे विद्यार्थी हे इंडस्ट्री रेडी म्हणूनच बाहेर पडतात व देश-विदेशातील नामवंत कंपन्यांमध्ये त्यांची निवड होते. पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वीच म्हणजे अंतिम वर्षात असतानाच विद्यार्थ्यांची या नामवंत कंपन्यांमध्ये झालेली निवड यामुळे विद्यार्थी व पालक वर्ग यामधून समाधान व्यक्त केले जात आहे. गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेजच्या यशात सर्व विद्यार्थ्यांचे प्रयत्न, त्यांचे पालक यांचा विश्वास आणि विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सातत्यपूर्ण योगदान आहे. अशी माहिती टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.एल.व्ही.बगले यांनी दिली आहे.

# पाटोदा येथे ट्रामा केअर सुरू करण्याची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्याचे ग्रामीण रुग्णालय असून तालुक्याचा विस्तार पाहता रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ग्रामीण रुग्णालयात आलेल्या कार्यरत कर्मचारी वर्ग या ठिकाणी उपस्थित असावा, तसेच शहरातुन दोन राष्ट्रीय महामार्ग जातात या महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढत आहे.त्यामुळे जखमींना वेळेवर उपचार मिळत नसल्याने ट्रामाकेअर सेंटरची गरज आहे.त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांनी नियुक्तीच्या ठिकाणीच उपस्थित राहावे रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड असावा.




स्वच्छ पाण्याची सोय करण्यात यावी या सर्व मागण्या मंजूर करण्यात याव्यात नसता आपल्या कार्यालयासमोर पंधरा दिवसांनी उपोषण करण्यात येईल. सफाई कर्मचाऱ्यांचे एक रिक्त पदे भरण्यात यावे. वरील मागण्यांचे विचार करून वरिष्ठ कार्यालयापर्यंत पोहोचावे अशा मागणीचे निवेदन ग्रामीण रुग्णालय अधिक्षक, तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांना मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात आले . मराठी पत्रकार परिषद तालुका अध्यक्ष प्रा अजय जोशी, जिल्हा उपध्यक्ष कादर मकराणी,सचिव हमीद पठाण, तालुका उपाध्यक्ष जावेद शेख, सय्यद सज्जाद, सतीश गर्जे. दिगंबर नाईक नवरे. पवन भोकरे ,आदी उपस्थित होते

# अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार करणाऱ्या नराधम शिक्षकाला १४ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा

## अंबाजोगाई सत्र न्यायालयाचा निकाल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**गुरू-शिष्याच्या पवित्र नात्याला काळीमा फासत अल्पवयीन विद्यार्थिनीवर वारंवार अत्याचार करणाऱ्या शाम दिगंबर वारकड या शिक्षकास अंबाजोगाई सत्र न्यायालयाने १४ वर्षे सश्रम कारावास आणि एकूण एक लाख दोन हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.**

याबाबत अधिक माहिती अशी की, अंबाजोगाई शहरातील खोलेश्वर विद्यालयामध्ये इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेणारी अल्पवयीन विद्यार्थिनी क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी क्रीडा शिक्षक शाम दिगंबर वारकड याच्यासोबत



जालना येथे गेली होती. स्पर्धेतून परतत असताना वाहनामध्ये शिक्षकाने तिच्यासोबत छेडछाड केली. जालन्याहून परत आल्यानंतर अंबाजोगाई येथील क्रीडा संकुल परीसरात वाहनामध्येच १७ ऑक्टोबर रोजी शाम वारकड याने तिच्यावर अत्याचार केला. ही घटना कोणालाही सांगू नकोस असे शिक्षकाने विद्यार्थीनीला धमकावले होते. त्यानंतर त्या मुलीवर नराधम शिक्षकाने अनेक वेळा अत्याचार केल्याचेही समोर आले. पीडित मुलगी भयभीत अवस्थेमध्ये होती. तिची अवस्था शाळेमधील एका महिला शिक्षकाच्या लक्षात आल्यानंतर तिने विद्यार्थीनीला विश्वासात घेऊन विचारपूस केली. त्यानंतर या घटनेचे बिंग फुटले. त्या मुलीने अंबाजोगाई शहर पोलिसामध्ये तक्रार दिल्यानंतर शाम वारकड याच्यावर अंबाजोगाई पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डीवायएसपी राहुल धस यांनी या प्रकरणाचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्या. खोचे यांच्यासमोर झाली. दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने शाम वारकड यास दोषी ठरवून १४ वर्षे सक्तमजुरी आणि १ लाख २ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने अभियोक्ता लक्ष्मण फड यांनी बाजू मांडली.

### खटल्याकडे होते शहराचे लक्ष

मराठवाड्यातील विद्येचे माहेरघर असणाऱ्या अंबाजोगाईसारख्या शहरात शिक्षकानेच असे घृणास्पद कृत्य केल्याने संतापाची लाट उसळली होती. अंबाजोगाईकरांनी मोर्चे काढून या घटनेचा निषेध व्यक्त करत आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. या खटल्याकडे संपूर्ण अंबाजोगाई तालुक्याचे लक्ष लागले होते.

# ८५ किलो गांजा जप्त करून ३ आरोपी अटक,स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल गांजा संदर्भात गोपनीय माहिती मिळाल्यावरून पोलीस अधीक्षक यांनी जालना जिल्हयात अंमली पदार्थ विक्री करणारे इसमांविरुध्द कार्यवाही करण्याचे सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने

दिनांक २३/०४/२०२५ रोजी जालना शहरातुन छत्रपती संभाजीनगर कडे एका /१६/ /८३०२ या कार मधुन तीघेजण अंमली पदार्थ गांजाची अवैध वाहतुक करणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखा व दहशतवाद विरोधी शाखा जालना यांनी संयुक्त कारवाई करुन आरोपी विजय अशोक गाळे .शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर २) अमोल व्दारकादास चांदणे रा. रुई ता. अंबड जि. जालना ३) बाबासाहेब पंढरीनाथ मुंजवार रा.भाडर्डी ता.अंबड जि. जालना यांचे ताब्यातुन एकुण ८५ किलो ६४० ग्रॅम गांजा व गुन्हयात वापरलेले वाहन व ०४ मोबाईल असा एकुण २८,९३,०००/- रु.



किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोउपनि. बाबासाहेब खार्ड दहशतवाद विरोधी शाखा जालना यांचे तक्रारी वरुन नमुद आरोपी विरुध्द पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे चंदनझिरा हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, श्री. अनंत कुलकर्णी उपविपो, अधिकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव सपोनि श्री. योगेश उबाळे, पोउपनि. राजेंद्र वाघ, पोउपनि. बाबासाहेब खाडे, पोउपनि. यासिन, /शेख अख्तर, पोहेकॉ मारोती शिवरकर विनोद गडदे, कैलास कुरेवाड जालना, स्था.गु.शा.चे रुस्तुम जैवाळ, रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशीक, सतीष श्रीवास, इरशाद पटेल, सचीन राऊत, कैलास चेके, चालक भरत कडुळे, सौरभ मुळे,

# रंगोत्सव स्पर्धेत चंद्रभागा पोद्दार लर्निंग स्कूलचे सुयश

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबई आयोजित रंगोत्सव स्पर्धेत माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील चंद्रभागा पोद्दार लर्निंग



स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यांचा गुणगौरव सोहळ्याच्या आयोजन गुरुवारी करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच अंगी असलेला कला विकसित व्हाव्या या उद्देशाने मुंबईतील रंगोत्सव सेलिब्रेशन च्या वतीने फेब्रुवारी महिन्यात रंगोत्सव स्पर्धेचे आयोजन देशपातळीवर करण्यात आले होते. या स्पर्धेत प्री प्रायमरी व इयत्ता १ली ते ८ वी या दोन गटात विद्यार्थ्यांच्या चित्रकला,हस्तकला स्पर्धेची परीक्षा झाली होती. या परीक्षेत चंद्रभागा पोद्दार लर्निंग स्कूलच्या ५४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. २७ विद्यार्थ्यांनी प्रथम, ६ विद्यार्थ्यांनी विशेष सहभाग, व २१ विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन पर बक्षीस मिळवली. या सर्व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन गुरुवारी सकाळी करण्यात आले होते. याप्रसंगी दिंद्रुड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, मुख्याध्यापक मनोहर कटारे, यांच्यासह शाळेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल ठोंबरे,प्राचार्य निलेश निंदाने, मुख्याध्यापिका अमृता गुळवे, कलाशिक्षक सारंग मगर, राजेंद्र पांडे, शालिक बोडखे, बाळू घुगे, आशिष लाखे, अमोल दळवे आदींची उपस्थिती होती.

# अनिल भंडारी यांना पितृशोक

**बीड । प्रतिनिधी**

## मिलापचंद भंडारी यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

शहरातील सारडा संकुल येथील रहिवासी सेवानिवृत्त कंडक्टर मिलापचंद पारसमल भंडारी यांचे बुधवारी २३ एप्रिल रोजी दुपारी ३:२० वाजता संथारा व्रताने निधन झाले. दुपारी बारा वाजेदरम्यान त्यांना प्रत्याख्यान देण्यात आले होते. मृत्यूसमयी त्यांचे वय ८३ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर येथील अमरधाम स्मशानभूमीत गुरुवारी दि.२४ एप्रिल रोजी सकाळी ८:०० वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले .त्यांच्या पक्षात दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे, चार भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे. लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, व्यापारी अभय भंडारी यांचे ते वडील होत. त्यांच्या अंत्यसंस्काराला नातेवाईक, शहरातील व्यापारी, पत्रकार, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.





बीड : बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जॉन्सन यांनी गुरुवारी पदभार स्विकारला. विवेक जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांचा सत्कार करताना मातृभुमी प्रतिष्ठान बीडचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, महाराष्ट्र अधिकारी संघटनेचे अध्यक्ष विजयकुमार राठोड, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, ह.भ.प. संजय महाराज गित्ते, संतोष गर्जे , पत्रकार संजय देवा कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत अंबाजोगाईच्या कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेच्या आदित्य जाधवने पटकावले रौप्यपदक

## रौप्यपदक जिंकून वाढविला महाराष्ट्राचा गौरव..!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत ग्रीको-रोमन कुस्तीच्या ४८ किलो वजनी गटात अंबाजोगाईच्या कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, आनंदनगर येथील इयत्ता ९ वी वर्गातील विद्यार्थी खेळाडू आदित्य दिलीप जाधव याने ऐतिहासिक कामगिरी करीत रौप्यपदक पटकावून शाळा, जिल्हा आणि महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे.**

छत्रसाल स्टेडियम, दिल्ली येथे मंगळवार, दिनांक २२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत आदित्यने दाखविलेल्या शौर्य, तंत्रनिपुणता आणि अखंड संघर्षाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा अंबाजोगाईच्या कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा - समुदायासाठी अभिमानाचा क्षण आहे. आदित्यच्या यशाने आश्रमशाळेच्या प्रांगणात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेचे संस्थापक सचिव अनिल रामधन राठोड यांनी आदित्यच्या पराक्रमाला आमच्या शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांच्या समन्वयाचे प्रतीक असे संबोधले. आदित्यने केवळ स्वतःसाठी नव्हे, तर शाळेच्या ३० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय पातळीवर कुस्तीत पदक मिळवून

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# तब्बल ५० शेतकऱ्यांचे विद्युत पंप चोरीला



**इंदापूर । प्रतिनिधी**

निमगाव केतकी परिसरातील सुमारे ५० शेतकर्यांच्या विहिरीवरील विद्युत पंपाच्या तांबे असलेल्या सबमर्सिबल केबल या आठ दिवसांमध्ये चोरीला गेल्या आहेत. मागील तीन वर्षांपासून सातत्याने केबलची चोरी होत असल्याने शेतकर्यांमधून संतापाची लाट निर्माण झाली आहे. तक्रारीची कोण दखलच घेत नसेल तर शेतकर्यांवरील अन्यायाला कोणी वाली आहे का नाही? असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.

शुक्रवारी (दि. १८) रात्री निमगाव केतकी हद्दीतील निरा डावा कालव्याशेजारील सुमारे २० शेतकर्यांच्या विहिरीवरील सबमर्सिबल केबल चोरीला गेल्या. यामध्ये प्रत्येक शेतकर्याला दोन ते पाच हजार रुपयांचा भुर्दंड बसला. यापेक्षाही पुन्हा केबल जोडण्यासाठी विद्युत पंप विहिरीवर उचलून जोडण्यासाठी ट्रॅक्टर व मनुष्यबळ याचा होणारा खर्च व मनस्ताप फार मोठा असल्याने शेतकरी त्रस्त झाला आहे. याबाबत निमगाव केतकी येथील शेतकरी हर्षवर्धन श्रीपती पाटील म्हणाले की, १८ एप्रिल रोजी घाडगे लवणातील २० पेक्षा जास्त शेतकर्यांच्या केबल चोरीला गेल्या. दोन वर्षांत तिसर्यांदा माझी केबल चोरीला गेली आहे.

एका वेळेस तीन हजार रुपयांचा फटका बसतो. त्यापेक्षाही पुन्हा केबल जोडण्यासाठी ट्रॅक्टर व मनुष्यबळ जास्त लागते. त्याचा खर्च केबलपेक्षा जास्त येतो आणि मनस्ताप खूपच होतो. मागील वर्षी आम्ही पोलिसांत तक्रार दिली होती; मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. याची कोण दखल घेणार नसेल तर आम्ही किती दिवस हा त्रास सहन करायचा? परिसरातील दोन-तीन तालुक्यांतील स्क्रॅप घेणार्या दुकानदारांना तंबी दिली, तरी अशा चोर्या होणार नसल्याचे ते म्हणाले. निमगाव केतकी येथील जगन्नाथ भोंग म्हणाले की, मागील वर्षी माझी केबल गेल्यानंतर पोलिसात तक्रार दिली. त्यानंतर विहिरीजवळ कॅमेरे बसविले. १८ एप्रिल रोजी चोर केबल नेण्यासाठी आल्यानंतर सायरन वाजल्यानंतर तिथून पळाले. मात्र, परिसरातील सर्व शेतकर्यांच्या केबल त्यांनी चोरून नेल्या.

दरम्यान, मंगळवारी (दि. २२) निमगाव केतकी व वरकुटे खुर्द येथील मानेवस्ती, शेंडेमळा, मुलाणीवस्ती, हेमाडेमळा येथील सुमारे २५ शेतकर्यांच्या केबल चोरीला गेल्याचे शेतकरी सांगत आहेत. प्रमोद हेमाडे म्हणाले की, रात्री तीन हजार रुपयांची केबल चोरीला गेली. आज पुन्हा तेवढ्याच किमतीची टाकावी लागली. यापेक्षाही पुन्हा केबल जोडणीचा मनस्ताप फार मोठा आहे. चोरांचा बंदोबस्त झाला पाहिजे.निमगाव केतकी येथील दादाराम बबन माने म्हणाले की, मागील आठवड्यात तीन हजार रुपयांची केबल टाकली होती. रात्री ती चोरीला गेली. सध्या शेतकरी हातबल आहे. चोरांचा तातडीने बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयावरून पतीकडून पत्नीचा खून; तीन महिन्यानंतर झाला खुनाचा उलगडा

**इंदापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील कळाशी येथील २६ वर्षीय विवाहित महिलेचा पतीनेच खून केल्याची घटना घडली. विशेष बाब म्हणजे तीन महिन्यापूर्वी सदर महिला बेपत्ता असल्याची तक्रार पतीनेच दिली होती.

यामध्ये पतीनेच तिचा खून करून मृतदेह नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील ढेकुगाव ते परधाडी घाटात निर्जनस्थळे टाकून दिला. हे इंदापूर पोलिसांनी केलेल्या तपासात निष्पन्न झाले असून, तब्बल तीन महिन्यानंतर या खुनाचा उलघडा झाला आहे. याप्रकरणी महिलेचा पती जोतीराम आबा करे व त्याचा मित्र दत्तात्रय शिवाजी गोलांडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करत त्यांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, २९ जानेवारी २०२५ रोजी प्रियंका जोतीराम करे (वय-२६ वर्षे, रा. कळाशी, ता. इंदापूर) या बेपत्ता झाल्याची तक्रार इंदापूर पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आली होती. त्यानंतर इंदापूर पोलिसांनी सखोल तपास करीत पुढे आलेल्या माहितीवरून, सुधिर भिमराव काळे (वय-४१ वर्षे, पोलिस हवालदार, इंदापूर पोलीस ठाणे) यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीनुसार २७ जानेवारी २०२५ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास जोतीराम आबा करे (वय-३४ वर्षे, रा. कळाशी ता. इंदापूर) व दत्तात्रय





शिवाजी गोलांडे (रा. गोलांडे वस्ती, इंदापूर, ता. इंदापूर) यांनी संगनमताने मौजे कळाशी, ता. इंदापूर गावचे हददीत राहते घरी बेपत्ता महीला प्रियंका जोतीराम करे (वय-२६ वर्षे, रा. कळाशी, ता. इंदापूर) हीच्या चारित्र्यावर संशय घेऊन, तुझे वागणे बरोबर नाही, त्यामुळे आमची नातेवाईक व जनमाणसात बदनामी होत आहे असे म्हणून गळा दाबून जिवे ठार मारले.

त्यानंतर चार चाकी वाहन (क्र.चक१४ ऊ-८९७२) मध्ये टाकून २८ जानेवारी २०२५ रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील मौजे ढेकुगाव ते परधाडी घाटात निर्मनुष्य असलेल्या ठिकाणी मृतदेह टाकून देऊन पुरावा नष्ट केला.यावरून वरील आरोपी विरुद्ध सरकारतर्फे फिर्यादी यांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय लेंडवे हे करत आहेत.

# ‘त्या’ काश्मिरी देवमाणसाला आयुष्यभर विसरणार नाही, वडिलांना अग्नी दिल्यानंतर आसावरी जगदाळेने सांगितला! थरार

**पुणे । प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यामध्ये पुण्यातील जिवलग मित्र संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. फिरायला गेलेल्या कुटुंबाचा आनंद क्षणात हिरावला गेला. दोन्ही कुटुंबे अजूनही मोठ्या धक्क्यात आहेत. पहलगाममध्ये मंगळवारी (दि.२३) झालेल्या हल्ल्यात संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांना दहशतवाद्यांनी गोळ्या घातल्या. दरम्यान आज दोन्ही मित्रांवरती अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. हल्ल्या झाला त्यावेळी अंगावर जे कपडे होते, त्यावरती रक्ताचे शिंतोडे पडले होते, त्याच कपड्यांनी आसावरीकडून वडिलांना अग्नी दिला आहे. आज सकाळी संतोष जगदाळेंवर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.



आसावरी जगदाळे म्हणाली, ३० मिनिटे आम्ही चढून तिथं गेलो. जागा खूप सुंदर आहे. फोटो काढत असताना अचानक फायरिंग सुरू झाली. लोक पळायला लागली. आम्ही टेंटमध्ये लपलो होतो. गणबोटे काका खाली झोपले होते, अनेक लोक तिथे टेंटमध्ये लपली होती. अनेक लोकांवर फायरिंग झाली. एकजण आमच्याकडे आला त्याला पकडून गोळ्या मारल्या. माझ्या वडिलांना ३ गोळ्या लागल्या. माझे वडील जागेवर पडले होते. काकांना देखील दोन गोळ्या लागल्या. त्यांनी फक्त पुरुषानं मारलं. आम्ही तिथून पळून आलो. एका तिथल्या स्थानिकाने आम्हाला मदत केली. सगळ्या स्थानिकांनी भरपूर मदत केली, असंही तिने सांगितलं.

मला तिथं चक्कर आली होती. मिलिटरी तिथे पोहचली होती. सगळ्या जखमी लोकांना श्रीनगरमध्ये शिफ्ट केलं गेलं होतं. रात्री १२ वाजता कळलं की, काही जणांचा मृत्यू झाला आहे. आम्हाला ओळख पटवण्यासाठी नेण्यात आलं. मला तेव्हा कळलं की बाबांचा आणि काकांचा मृत्यू झाला आहे. तिथला देवासारखा एक माणूस आमच्यासोबत उभा होता. आम्ही त्यांचे आयुष्यभर उपकार विसरणार नाही. आर्मीने आम्हाला खूप मदत केली. माझे वडील माझ्या कुटुंबाचे एकमेव आधार होते. घरात तेच कमवते होते. आज मी माझ्या वडिलांचा अंत्यसंस्कार करून आले. मला ते सगळं विसरणं खूप अवघड आहे, असंही ती पुढे म्हणाली.

माझ्या डोळ्यासमोर माझ्या वडीलांना गोळ्या मारल्या आहेत. हे माणसं नाहीत राक्षस आहेत. ते पहाडी मधून आले जंगलातून अचानक आले. चारही बाजूला मृतदेह दिसत होते. ते अतिरेकी कुठून आले सांगू शकणार नाही. कारवाई झाली पाहिजे कुणालाही सोडू नका. फायरींग करणारे चार ते पाच लोक होते. १५ ते २० मिनिटे सगळं सुरू होतं. कलमा वाचून दाखवा असं ते म्हणत होते. त्याचा होता का? कुठल्या हेतूने त्यांनी मारलं हे माहिती नाही. माझे वडील म्हणत होते, तुम्हाला जे हवंय ते करतो, पण तरीही मारलं.

अनेकांच्या डोक्यात गोळ्या मारल्या होत्या. ते म्हणत होते की, आम्ही लहान मुलांना आणि स्त्रियांना मारणार नाही, असंही यावेळी आसावरी जगदाळेनी सांगितलं.

# आगीत ९० झोपड्या जळाल्या; आगीची चाहुलीने रहिवासी बाहेर आले अन् मोठा अनर्थ टळला

**पुणे । प्रतिनिधी**

नगर रस्त्यावरील चंदननगर भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतीत बुधवारी (दि.२३) पहाटे आग लागल्याची घटना घडली. आगीची चाहुल लागताच रहिवासी बाहेर पळाल्याने मोठा अनर्थ टळला. वर्दी मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविले. आग लागल्यानंतर १० गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने घबराट उडाली. आगीत ९० पेक्षा जास्त झोपड्या जळाल्या असल्याची माहिती अग्निशमन दलातील अधिकार्यांनी दिली. वसाहतीतील रस्त्यावर लावलेल्या चार ते पाच दुचाकीही जळाल्या.



शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे.

चंदननगर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत आहे. या वसाहतीत कष्टकरी मोठ्या संख्येने राहायला आहेत. बुधवारी पहाटे पाचच्या सुमारास वसाहतीतील झोपड्यांना आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य केंद्रातील नियंत्रण कक्षाला मिळाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे १५ बंब आणि टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भडकल्यानंतर वसाहतीतील नागरिक बाहेर पळाल्याने गंभीर दुर्घटना टळली. झोपड्यांमधील दहा गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने आग भडकली. स्फोटाच्या आवाजामुळे घबराट उडाली.

अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ८० जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आगीमागचे निश्चित कारण समजू शकले नाही. आगीत झोपड्यांमधील गृहोपयोगी वस्तू जळाल्या. डोळ्यादेखत संसार जळाल्याने अनेकांना दुःख अनावर झाले. जवानांनी शर्थीच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले असून, आगीत कोणी जखमी झाले नाही. जवानांनी झोपड्यांमधून १०० पेक्षा जास्त सिलिंडर बाहेर काढले. सिलिंडर बाहेर काढल्याने गंभीर दुर्घटना टळली, असे अग्निशमन दल प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी सांगितले.

# सासरच्या जाचाला कंटाळून नवविवाहितेची आत्महत्या; घरात गळफास घेऊन संपवले जीवन

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून आत्महत्या केल्याचा अनेक घटना उघडकीस ये असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पती तसेच सासू-सासरे व इतर नातेवाईक यांच्या सततच्या जाचाला कंटाळून नवविवाहितेने गळफासवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. राहत्या घरात तिने गळफास लावून आपले जीवन संपवले आहे.



याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मोहिनी आकाश करनुरे (वय २१, रा. देवाची ऊरळी, ता. हवेली) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी मोहिनी हिचे वडिल ज्ञानेश्वर माशाळे (वय ४६, रा. उमरगा, जि. धाराशिव) यांनी फुरसुंगी पोलिसांत तक्रार दिली आहे. यानूसार पोलिसांनी पती आकाश विलास करनुरे, सासरे विलास नारायण करनुरे व सासू शोभा विलास करनुरे यांना अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, मोहिनी व आकाश यांचा गेल्या वर्षी (ऑगस्ट २०२४) मध्ये विवाह झाला आहे. विवाहानंतर मोहिनी ही पती व सासू-सासऱ्यांसोबत देवाची ऊरळी येथील ओसवाल मळा येथे राहत होती. दरम्यान, पती, सासू-सासरे आणि इतर नातेवाईकांनी तिला माहेरहून पैसे आणण्यासाठी तगादा लावला होता. तसेच, तिला टोचून बोलत तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. या सततच्या छळाला कंटाळून मोहिनी हिने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली. अत्यंसंस्कार केल्यानंतर वडिलांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यानंतर गुन्हा नोंद करून तिघांना अटक केली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# वडगावात मावळमध्ये शरद पवार गट आक्रमक; वाढत्या महागाई विरोधात एल्गार आंदोलन

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

राज्यामध्ये अनेक गोष्टींच्या किमती वाढल्या आहेत. यामुळे सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसत आहे. या वाढत्या महागाईच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आक्रमक झाला आहे. मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने गुरूवारी (दि.२४) वडगाव मावळ तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.

याप्रसंगी मावळ तालुकाध्यक्ष दत्तात्रय पडवळ, मावळ प्रभारी तथा पुणे जिल्हाध्यक्ष ओबीसी विभाग अतुल राऊत, युवक तालुकाध्यक्ष विशाल वहिले, महिला तालुकाध्यक्ष जयश्रीताई पवार, अल्पसंख्यांक विभाग जिल्हा उपाध्यक्ष आफताब सय्यद,तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते आदी उपस्थित होते. वाढत्या महागाईमुळे सर्व सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे .सध्या कच्च्या तेलाच्या किमती चार वर्षाच्या निचांकी पातळीवर आल्या आहेत.

यापूर्वी एप्रिल २०२१ मध्ये किंमत प्रति बॅरल ६३.४० होती. या घसरणीमुळे पेट्रोल आणि डिझेल शुद्धीकरणातून मिळणारे उत्पन्न ऐतिहासिक पातळीवर पोहोचले आहे. रेटिंग एजन्सी नुसार सध्या तेल कंपन्यां पेट्रोलवर प्रतिलिटर रु. १२-१५ आणि डिझेलवर प्रति लिटर ६-१२नफा कमवत आहेत. तेल कंपन्यांनी गेल्या एक वर्षापासून पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी केलेल्या नाहीत सरकार पेट्रोल डिझेलच्या किमती वाढवून जनतेच्या पैशाची लूट करत आहे. याच्या निषेधार्थ मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महागाईच्या विरोधात एल्गार आंदोलन करण्यात आले. अशा आशयाचे निवेदन मावळचे नायब तहसीलदार गणेश तळेकर यांना देण्यात आले.

# कात्रजच्या खोल दरीत ट्रक कोसळला; चालक गंभीर जखमी, अग्निशामक दलाने वाचवले प्राण

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज जुन्या बोगद्यामधून पुण्याकडे येताना पहिल्या तीव्र वळणानंतर चालकाचे नियंत्रण सुटल्याने दहा टायर असलेला ट्रक (चक१२ घझ १०७३) थेट २०० फूट खोल दरीत कोसळला. हा भीषण अपघात सायंकाळी ४:१५ वाजता घडला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ अग्निशामक दलाला कळवल्याने कात्रज अग्निशामक दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले आणि खोल दरीतून जखमी चालकाला बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले.

विकास बालाजी रसाळ (वय ३२, रा. लातूर) असे जखमी चालकाचे नाव आहे. प्रत्यक्षदर्शींनुसार, ट्रकमध्ये





कोणतेही सामान नव्हते आणि चालक एकटाच वाहन चालवत होता. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तीव्र वळण आणि चालकाचे नियंत्रण सुटणे यामुळे हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे चालकाचा जीव वाचला असला, तरी त्याची प्रकृती गंभीर आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, अपघाताच्या कारणांचा तपास सुरू आहे. या घटनेने कात्रज परिसरातील रस्त्यांच्या सुरक्षिततेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# जैन मंदीर पाडल्याच्या निषेधार्थ बारामतीत मोर्चा

**बारामती । प्रतिनिधी**

मुंबईतील विलेपार्ले येथील दिगंबर जैन समाजाचे मंदीर व जिनमूर्तीची मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांनी बुलडोझर चालवून मंदीर जमीनदोस्त करत जिनमूर्ती व जिनशास्त्राची अवहेलना केली. या घटनेच्या निषेधार्थ बारामतीत गुरुवारी (ता. २४) निषेध मोर्चाचे आयोजन केले होते. बारामतीकरांनी उत्स्फूर्तपणे व्यवहार बंद ठेवून या मोर्चाचे समर्थन केले.

गुरुवारी सकाळी महावीर पथ येथील श्री मुनिसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदीरापासून निषेध मोर्चास प्रारंभ झाला. यामध्ये सकल जैन समाज तसेच सर्वधर्मिय बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गांधी चौक, सुभाष चौक, भिगवण चौकातून इंदापूर चौक मार्गे निषेध मोर्चा प्रशासकीय भवन येथे गेला.

बारामतीचे तहसिलदार गणेश शिंदे यांना या प्रसंगी सकल जैन धर्मियांच्या वतीने निवेदन दिले. किशोरकुमार शहा, मनोज मुथा व



दिलीप धोका यांच्या या निवेदनावर सह्या आहेत. माजी नगराध्यक्ष जवाहर वाघोलीकर, मंगल सराफ, भारती मुथा, माजी उपनगराध्यक्ष संजय संघवी यांच्यासह अॅड. संदीप गुजर, सत्यव्रत काळे, सुशील सोमाणी, सुनिल शिंदे, अक्षय देवकाते, रवींद्र चव्हाण, सुरेंद्र जेवरे, काळूराम चौधरी, आसिफ खान, साधू बल्लाळ, शुभम अहिवळे, श्रीकांत जाधव, रमेश मोरे, जगदीश पंजाबी यांच्यासह अनेक जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘या’ आहेत जैन समाजाच्या मागण्या?

विलेपार्ले येथील जैन मंदिरावर हल्ला व धर्माची विटंबना करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करुन निलंबित करावे. मंदिर पूर्व स्थितीत जसे होते तसे पुन्हा त्याच जागेवर बांधून त्याचे पुनर्निर्माण करुन ते जैनवासियांना सुपूर्द करावे. समाजाच्या शुचितेसाठी कडक नियम करावे, जेणेकरुन पुन्हा इतरांनी जैन समाजाकडे गैर नजरेने पाहू नये व गैरवर्तन करु नये. जैन धर्मस्थळांची व साधूंची सुरक्षा सुनिश्चित करण्यात यावी व यासाठी संबंधित अधिका-यांना सूचित करावे. जैन समाजाच्या अल्पसंख्यांक कायद्यानुसार त्यांचा सन्मान राखला जावा.

# पुणेकरांकडून कौस्तुभ गनबोटे, संतोष जगदाळे यांना साश्रूनयनांनी अखेरचा निरोप


**पुणे । प्रतिनिधी**

दहशतवादी हल्ल्यात मृत्यू पावलेले कौस्तुभ गनबोटे व संतोष जगदाळे यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी वैकुंठ स्मशानभूमीमध्ये साश्रूनयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले. गनबोटे व जगदाळे यांना अखेरचा निरोप देण्यासाठी हजारो पुणेकरांनी अंत्ययात्रा व अंत्यसंस्कारासाठी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

नागरिकांनी ;भारत माता की जय’चा जोरदार जयघोष करतानाच, जला दो, जला दो पाकिस्तान को जला दो’, ’पाकिस्तान मुर्दाबाद’ अशा घोषणांनी आपल्या मनातील तीव्र संताप व्यक्त केला. दहशतवादी हल्ल्याच्या घटनेनंतर सलग तिसऱ्या दिवशी देखील संपूर्ण शहर अक्षरशः शोकसंतप्त होते.

कोंढव्यात राहणारे कौस्तुभ गनबोटे हे त्यांच्या पत्नी संगीता, तसेच त्यांचे वारजे येथील कौटुंबिक मित्र संतोष जगदाळे, त्यांची पत्नी प्रगती व मुलगी आसावरी असे पाच जण जम्मू काश्मीर येथे पर्यटनासाठी गेले होते. मंगळवारी पहलगाम येथे पर्यटन करत असताना दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात दोघेजण गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यानच त्यांचा रुग्णालयात मृत्यू झाला होता.

त्यानंतर, बुधवारी मध्यरात्री दोघांचेही पार्थिव पुण्यात आणण्यात आले. दरम्यान, गुरुवारी सकाळी गनबोटे यांच्या कोंढवा येथील निवासस्थानापासून तर जगदाळे यांच्या वारजे येथील घरापासून अंत्ययात्रा सुरू झाली. फुलांनी सजविलेल्या रुग्णवाहिकेमध्ये त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले होते. कडक पोलिस बंदोबस्तात व हजारो नागरिकांच्या सहभागात अंत्ययात्रेला सुरवात झाली.



गनबोटे व जगदाळे यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळींसह हजारो पुणेकरांनी या अंत्ययात्रेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. वैकुंठ स्मशानभूमीमध्ये सकाळी आठ वाजल्यापासूनच नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. सकाळी ९.२० ते १० या वेळेत दोघांचेही पार्थिव वैकुंठ स्मशानभूमीमध्ये दाखल झाले. त्यानंतर विद्युत दाहिनीमध्ये गनबोटे व जगदाळे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. जगदाळे यांची मुलगी आसावरी हिने वडीलांचे उत्तरकार्य केले. अंत्यसंस्कारावेळी नागरिकांच्या चेहऱ्यावर एकीकडे दोघांच्या जाण्याचे दुःख होते, तर दुसरीकडे दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानविरुद्ध नागरिकांच्या बोलण्यांमध्ये प्रचंड संताप दिसत होता. नागरिकांनी भारत माता की जय’चा जोरदार जयघोष करतानाच जला दो, जला दो पाकिस्तान को जला दो’, ’पाकिस्तान मुर्दाबाद’च्या अशा घोषणा देत आपला राग व्यक्त केला.

यावेळी केंद्रीय हवाई वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगर विकास विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते बाळा नांदगावकर, आमदार हेमंत रासने, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, अंकुश काकडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपक मानकर, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे आदी यावेळी उपस्थित होते.